

दैनिक **राज्य लोकतंत्र**

www.epaper.rajyaloktantra.com   **नवी दिशा... नवे विचार.....**   email:rajyaloktantra75@gmail.com

**घटस्थापना**

नवरात्रोत्सवानिमित्त सर्व भाविक-भक्तांना हार्दिक शुभेच्छा !

बीड - महाराष्ट्र | वर्ष-५ | अंक-१४७ | सोमवार, दि.२२ सप्टेंबर २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने-६ | किंमत ३ रूपये


# राज्यातील पडीक जमिनही येणार रेकॉर्डवर !

## कायम पड क्षेत्राची ई-पीक पाहणीत होणार नोंद, निव्वळ लागवडीखालील क्षेत्र होणार स्पष्ट

**पुणे । प्रतिनिधी**

**सातबारा उताऱ्यावर असलेले कायम पड अर्थात पेरणी अयोग्य असलेले क्षेत्र आता ई-पीक पाहणीच्या माध्यमातून रेकॉर्डवर येणार आहे. परिणामी सध्या एकूण लागवड क्षेत्रात असलेले हे क्षेत्र कमी केल्यास राज्यातील निव्वळ लागवडीखालील क्षेत्र स्पष्ट होणार आहे.**



भूमी अभिलेख विभागाने याबाबत जानेवारीतच सर्व जिल्हाधिकाऱ्यांना हे क्षेत्र नोंदविण्याचे निर्देश दिले होते. मात्र, त्याबाबत उदासीनता दिसून आली. त्यामुळे पुन्हा हे क्षेत्र ई-पीक पाहणीतून नोंदविण्याचे निर्देश दिले आहेत. शेतकऱ्यांच्या स्तरावर नोंदणीसाठी ३० सप्टेंबरची मुदत असून, त्यानंतर सहायकांच्या स्तरावर ही नोंदणी होईल, याची दक्षता घ्यावी, असेही स्पष्ट करण्यात आले आहे. राज्यात २०१३ च्या कृषी गणनेनुसार राज्यात सरासरी १ कोटी ६९ लाख हेक्टरवर लागवड केली जात असल्याचे गृहीत धरले जाते. मात्र, ही आकडेवारी निश्चित नाही. यात कायम पड असलेल्या क्षेत्राचाही समावेश आहे. या कायम पड क्षेत्राची नोंद काही शेतकऱ्यांनी सातबारा उताऱ्यावर केली आहे. मात्र, काहींनी ती केलेली नाही. त्यामुळे प्रत्यक्ष लागवडीखालील क्षेत्राची आकडेवारी कमी आहे. राज्यात सुमारे ४ कोटी स्वमालकीचे क्षेत्र आहे. तर सुमारे ३ कोटी शेते आहेत. यात काही क्षेत्र वैयक्तिक तर काही क्षेत्र सामाईक आहे. राज्यामध्ये ११ कोटी लोकसंख्येपैकी महसूल विभागातील अधिकार अभिलेखात सातबारा उतारा नावावर असलेल्यांची संख्या १ कोटी ▶▶ पान २ वर

### पीक पाहणीची जबाबदारी जिल्हाधिकाऱ्यांची

◆ ई पीक पाहणी सध्या डिजिटल क्रॉप सर्व्हे या ॲपद्वारे करण्यात येत आहे. सद्यःस्थितीमध्ये राज्यातील लागवडी योग्य क्षेत्र १ कोटी ६९ लाख हेक्टरपैकी ८१ लाख ४ हजार हेक्टर अर्थात ४७.८९ टक्के क्षेत्रातील पिकांची नोंद झाली आहे. पूर्वी दिलेल्या १४ सप्टेंबरच्या मुदतीत शेतकरी स्तरावरील पिकांची नोंद किमान ६० टक्के होणे अपेक्षित होते. त्या तुलनेत पीक पाहणीचे प्रमाण कमी आहे. शेतकरी स्तरावरील पीक पाहणी झाल्यावर सहाय्यक स्तरावर पीक पाहणी करण्यात येणार आहे. त्यासाठी राज्यामध्ये एकूण ४९ हजार ३६६ सहायकांची नोंद झाली. सहायकांमार्फत प्रत्येक गावातील १०० टक्के स्वमालकीच्या क्षेत्रातील पीक पाहणी करून घेण्याची जबाबदारी जिल्हाधिकाऱ्यांची असेल.

## थोडक्यात...

### मनुवाद झुगारावा, संघ बरखास्त करावा-सपकाळ

◆ पुणे : स्वतःला सांस्कृतिक संघटना म्हणवून घ्यायचे आणि मनुस्मृतीमधील विषारी, विखारी प्रचार करायचा, हे १०० वर्षे पूर्ण करणाऱ्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे तत्त्वज्ञान आहे. विजयादशमीला संघाने सीमोल्लंघन करत, मनुवाद झुगारावा आणि संघ बरखास्त करावा. रेशीम बागेतील मनुस्मृती हटवून, संविधानाची पूजा करण्यासाठी काँग्रेसच्या वतीने संघ मुख्यालयावर मोर्चा काढणार आहे,'' अशी माहिती काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी दिली. पुणे श्रमिक पत्रकार संघातर्फे आयोजित वार्तालापात सपकाळ बोलत होते. या वेळी संघाचे अध्यक्ष ब्रिजमोहन पाटील, सरचिटणीस मंगेश फल्ले उपस्थित होते. सपकाळ म्हणाले, की संत ज्ञानेश्वर महाराजांपासून ते विविध साधुसंतांनी मनुवादाला झुगारून राजकीय क्रांती केली आहे.

### बलात्काराचा खोटा आरोप म्हणजे सन्मानाने जगण्याचा हक्क हिरावणे - हायकोर्ट

◆ भोपाळः एखाद्यावर बलात्काराचा आरोप करणे हे केवळ आरोपीच्या व्यक्तिगत शारीरिक आणि मानसिक छळाचे कारण बनत नाही, तर संपूर्ण समाजात त्यांची प्रतिमा आणि प्रतिष्ठा खराब होते. म्हणूनच, बलात्काराचा खोटा आरोप हा एखाद्या व्यक्तीच्या सन्मानाने जगण्याचा हक्क हिरावून घेण्यासारखा आहे, असे निरीक्षण मध्य प्रदेश उच्च न्यायालयाने नुकतेच नोंदवले. तसेच, ज्येष्ठ वकिलावर बलात्काराचा खोटा आरोप करणाऱ्या महिलेवर तत्काळ दंडात्मक कारवाईचे आदेशही न्यायालयाने दिले आहेत.

### पत्रकारांना मारहाण प्रकरणात ठेकेदाराला नोटीस

◆ नाशिकः आगामी सिंहस्थाच्या पार्श्वभूमीवर साधू-महंतांच्या बैठकीचे वार्तांकन करण्यासाठी जाणाऱ्या पत्रकारांवर झालेल्या मारहाण प्रकरणात आता त्र्यंबक नगरपरिषद ॲक्शन मोडवर आली आहे. या हल्ल्यामुळे निर्माण झालेल्या संतप्त प्रतिक्रिया आणि जनक्षोभाच्या पार्श्वभूमीवर नगरपरिषदेकडून वाहन फी वसुलीचे कंत्राट देण्यात आलेल्या ठेकेदाराला कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली असून, त्याला ४८ तासांचा अल्टिमेटम देण्यात आला आहे. शनिवारी २० सप्टेंबर रोजी साधू-संतांच्या बैठकीचे वार्तांकन करण्यासाठी गेलेल्या पत्रकारांवर चार ते पाच जणांच्या टोळक्याने प्रवेश फी वसुली दरम्यान रस्त्यावरच जबर मारहाण केली.

### मणिपूरमध्ये संघर्ष सुरूच; ५७ हजार अद्याप विस्थापित

◆ इम्फाळः मणिपूरमधील वांशिक हिंसाचाराला अडीच वर्षांहून अधिक काळ लोटला आहे. तरीही अद्याप राज्यातील दोन्ही समाजांतील तेढ मिटल्याचे किंवा परस्परांबद्दल विश्वास निर्माण करण्यात अपयशच आले आहे. या काळात २०० हून अधिक लोकांचा मृत्यू झाला आहे, तर ६२,००० हून अधिक लोकांना विस्थापित व्हावे लागले आहे. या संघर्षाने मैतेई आणि कुकी-झो समुदायांमधील सलोखा पूर्णपणे नष्ट केला आहे. दोन्ही समुदायांमधील संवाद पूर्णपणे थांबला आहे. सध्या मणिपूरमध्ये शांतता आणि आर्थिक प्रगतीची काही चिन्हे दिसत आहेत. बाजारपेठा पुन्हा सुरू झाल्या आहेत आणि आंतरजिल्हा सीमावर्ती भागांमध्ये काही प्रमाणात सुरक्षेची भावना परत आली आहे.

# आजपासून घर, वाहन, प्रवास स्वस्त

## गरीबांचे स्वप्न साकार होणार-पंतप्रधान नरेंद्र मोदी




**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी (२१ सप्टेंबर २०२५) राष्ट्राला संबोधित करताना 'नेक्स्ट जनरेशन जीएसटी' सुधारणांना 'जीएसटी बचत उत्सव' म्हणून घोषित केले. या सुधारणांमुळे गरीब आणि मध्यमवर्गीय कुटुंबांना घर बांधणे, टीव्ही, फ्रीज, बाईक सारख्या वस्तू खरेदी करणे आणि प्रवास करणे आता परवडणारे होणार आहे, असे ते म्हणाले. ▶▶ पान २ वर

### आधी जनतेवर मोठा घाव, आता श्रेय घेण्याचा प्रयत्न-काँग्रेस

◆ नवी दिल्लीः घटनात्मक संस्था असणाऱ्या जीएसटी परिषदेने कररचनेत सुधारणा केल्या. मात्र, त्याचे श्रेय पंतप्रधान नरेंद्र मोदी केवळ स्वत:कडेच घेण्याचा प्रयत्न करत आहेत, असे टीकास्त्र काँग्रेसने सोडले. मोदींनी देशाला उद्देशून केलेल्या भाषणावर विरोधकांनी तीव्र प्रतिक्रिया दिल्या. काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी जोरदार पलटवार केला. काँग्रेसने सुटसुटीत जीएसटीचा आग्रह धरला होता. मात्र, मोदी सरकारने ९ विविध टप्प्यांच्या माध्यमातून गब्बर सिंग टॅक्स लादला. त्यातून ८ वर्षांत तब्बल ५५ लाख कोटी रूपयांची वसुली करण्यात आली. आता मोदी २.५ लाख कोटी रूपयांच्या बचत उत्सवाविषयी बोलत आहेत. आधी जनतेवर मोठा घाव घालून आता किरकोळ बँड-एड लावले जात आहे.

# धनगरांना फसवणाऱ्यांची घरं जाळा !

## ● धनगर उपोषणकर्ते आंदोलक दिपक बोऱ्हाडेंचा चितावणीखोर इशारा

**जालना । प्रतिनिधी**

२४ तारखेनंतर सरकार जर खबरदार झाले नाही तर नेपाळमध्ये जसे झाले त्या पलीकडे घडवा, असा चितावणीखोर इशारा धनग३र आंदोलक दिपक बोऱ्हाडे यांनी दिला आहे. ज्या दिवशी दिपक बोऱ्हाडेचा श्वास बंद होईल त्या दिवशी धनगर समाजाला फसवणाऱ्यांची घरं जाळून टाका, असे त्यांनी म्हटले आहे. सरकार खबरदार...असे म्हणत धनगर उपोषणकर्ते दीपक बोऱ्हाडे यांनी राज्य सरकारला इशारा दिला आहे. माझा श्वास चालू



आहे तोपर्यंत धनगर समाजाला एसटी मधून आरक्षण द्या. २४ तारखेचा मोर्चा होईपर्यंत मी मरणार नाही असेही ते म्हणाले.

जालन्यात गेल्या पाच दिवसांपासून धनगर आंदोलक दीपक बोऱ्हाडे यांचे आमरण उपोषण सुरु आहे. धनगर समाजाला प्रवर्गातून आरक्षण देण्याच्या मागणीसाठी हे उपोषण सुरु आहे. रविवारी या उपोषणाला अँड. गुणरत्न सदावर्ते यांनी भेट देऊन पाठिंबा दिला. यावेळी उपोषणकर्ते दीपक बोऱ्हाडे यांनी उपस्थित असणाऱ्यांना मार्गदर्शन करताना चिथावणीखोर वक्तव्य केले. माझा श्वास ▶▶ पान २ वर

# राज्यात ५,५०० सहाय्यक प्राध्यापकांची मेगा भरती

## ● मार्च २०२६ पूर्वीच होणार नियुक्ती

**नांदेड । प्रतिनिधी**

मार्च २०२६ पूर्वी राज्यातील वरिष्ठ महाविद्यालयांसाठी ५,५०० सहाय्यक प्राध्यापकांची भरती केली जाईल.असे महाराष्ट्राचे उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी सांगितले.नांदेड येथील स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या २८ व्या दीक्षांत समारंभात ते बोलत होते.

सरकारने वरिष्ठ महाविद्यालयांसाठी ५,५०० सहाय्यक प्राध्यापक आणि २,९०० शिक्षकेतर पदांना मान्यता दिली आहे. वित्त आणि नियोजन विभागांनी त्यांची संमती दिली आहे.लवकरच एक ठराव जारी केला ▶▶ पान २ वर

# २०४७ पर्यंत नरेंद्र मोदीच असतील पंतप्रधानपदाचे उमेदवार

## राजनाथ सिंह यांनी चेहरा बदलाच्या चर्चेला दिला पुर्णविराम


**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

पंतप्रधान नरेंद्र मोदी २०४७ मध्ये विकसित भारत होईपर्यंत देशाचे नेतृत्व करतील, असे प्रतिपादन संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी केले. एका मुलाखतीमध्ये २०२९ मध्ये भाजपचा पंतप्रधान पदाचा चेहरा कोण असेल? असा प्रश्न



विचारला असता. राजनाथ सिंह म्हणाले की, २०२९, २०३४,२०३९,२०४४ आणि २०४७ मध्ये विकसित भारत होईपर्यंत पंतप्रधान नरेंद्र मोदी हेच चेहरा असतील. राजनाथ सिंह म्हणाले की, सध्या आणि येणाऱ्या अनेक वर्षांसाठी पंतप्रधानपदाची जागा रिक्त नाही, कारण नरेंद्र मोदी पंतप्रधान राहतील. ▶▶ पान २ वर

## माळ पहिली



**आश्विनशुद्धपक्षीं अंबा बैसलि सिंहासनी हो ।।**
**प्रतिपदेपासून घटस्थापना ती करूनी हो ।।**
**मूलमंत्रजप करूनी भोंवते रक्षक ठेउनी हो ।।**
**ब्रह्माविष्णुरुद्र आईचें पूजन करिती हो ।। १ ।।**
**उदो बोला उदो अंबाबाई माऊलीचा हो ।**
**उदाकारें गर्जनी काय महिला वर्णू तिचा हो ।। ध्रु० ।।**

# मुंबई महापालिकेसाठी ठाकरे बंधूंचा फॉर्म्युला ठरला?

**मुंबई । प्रतिनिधी**

मुंबईतील महापालिका निवडणुकीसाठी शिवसेना (यूबीटी) आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेना त्यांच्या बालेकिल्ल्यात समान जागा वाटून घेण्याची शक्यता आहे आणि उर्वरित महानगरासाठी ६०:४० चा फॉर्म्युला स्वीकारण्याची शक्यता आहे, असे सूत्रांनी सांगितले.

उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील सेना



(यूबीटी) आणि त्यांचे चुलत भाऊ राज ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील ▶▶ पान २ वर

# प्रॉपर्टी साठी आईची निर्घुण हत्या!

**परळी । प्रतिनिधी**

परळी तालुक्यातील भोजनकवाडी गावात एक हृदयद्रावक आणि धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. जन्म दिलेल्या आईला केवळ घर नावावर करून देत नाही म्हणून तिच्या मुलानेच दगडाने डोक्यात मारून निर्घृण हत्या केल्याची घटना दि. २० सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी ९.३० वाजता उघडकीस आली. या प्रकरणी पोलीस ठाणे परळी ग्रामीण येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीला पोलीसांनी ताब्यात घेतले आहे.

याबाबत पोलीस सूत्रांकडून प्राप्त अधिक माहितीनुसार, आरोपी चंद्रकांत कांगणे वय अंदाजे २६ वर्ष हा आपल्या ▶▶ पान २ वर

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.२० सप्टेंबर २०२५**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
| --- | --- | --- | --- |
| गहू: ४४.५० क्विंटल | २,४०० | ३,०३० | २,६४९ |
| ज्वारी/हायब्रिड: १४०.५० क्विंटल | १,९५० | ३,२५१ | २,३९० |
| मका/लोकल:५.०० क्विंटल | २,१७५ | २,१७५ | २,१७५ |
| तूर : १८.०० क्विंटल | ४,२०० | ६,१२१ | ५,४६४ |
| उडीद : ५८.०० क्विंटल | ४,८०० | ६,१५१ | ५,२९७ |
| बाजरी: ४३.५० क्विंटल | २,१४० | २,७८१ | २,५४७ |
| मुग: ३.५० क्विंटल | ३,५०० | ५,२०० | ४,५०० |
| सोयाबीन: ३२.५० क्विंटल | ३,७२५ | ४,२०० | ३,९४३ |
| हरभरा:२.०० क्विंटल | ५,१०० | ५,१०० | ५,१०० |

# ना.पंकजा मुंडे यांच्याकडून नुकसानीची पाहणी

## शासकीय मदत मिळवून देण्यासाठी प्रयत्नशील ; शेतकऱ्यांना दिला दिलासा

**बीड । प्रतिनिधी**

**राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी पाटोदा तालुक्यात शेताच्या बांधावर जावून नुकसानीची पाहणी केली. शासकीय मदत मिळवून देण्यासाठी मी प्रयत्नशील आहे अशा शब्दांत त्यांनी शेतकऱ्यांना दिलासा दिला.**





बीड जिल्ह्यात नुकत्याच झालेल्या अतिवृष्टीत अतोनात नुकसान झालेल्या पाटोदा तालुक्यातील भाकरेवस्ती तसेच वैद्यकिन्ही परिसरातील शेताच्या बांधावर जावून पंकजाताई मुंडे यांनी दुपारी नुकसानीची पाहणी केली. पावसामुळे बाजरी, सोयाबीन, कापूस, उडीद आदी पिके पूर्ण जमीनदोस्त झाली आहेत. नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना शासनामार्फत मदतीसाठी आपण प्रयत्न करीत असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी पाहणी करताना त्यांच्यासमवेत महसूल विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

# आजारास कंटाळून व्यापाऱ्याची आत्महत्या

**केज । प्रतनिधी**

केज येथे एका ६२ वर्ष वयाच्या आडत व्यापाऱ्याने आजारास कंटाळून घराच्या तळमजल्यात लोखंडी आडूला दोरीने गळफास लावून जीवन संपविलेची घटना घडली आहे.

केज शहरातील नवामोंढा परिसरात प्रसिद्ध आडत व्यापारी राधेशाम श्रीराम तोष्णीवाल (वय ६२) यांची आडत व त्याठिकाणी राहते घर आहे. ते मागील काही दिवसापासून आजारी होते. आजारास कंटाळून राधेश्याम तोष्णिवाल यांनी टोकाची भूमिका घेत दि. १९ सप्टेंबर शुक्रवारी रात्री १०:०० वाजेच्या सुमारास घराच्या तळमजल्यात लोखंडी आडूला दोरीने गळफास घेऊन जीवन संपविले. या घटनेची माहिती मिळताच पोलीस उपनिरीक्षक सुकुमार उर्फ राकेश बनसोडे, जमादार दत्तात्रय बिक्कड यांनी घटनास्थळी भेट देऊन मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी पाठवून दिला. उपजिल्हा रुग्णालयात शवविच्छेदन झाल्यानंतर शनिवारी अंत्यसंस्कार करण्यात आले. पोलीस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांच्या मार्गदर्शनात जमादार दत्तात्रय बिक्कड हे पुढील तपास करीत आहेत.

## अग्रलेख

# आरक्षणाच्या नावाने बोटं मोडून चालणार नाही !

सध्या आरक्षणावरून घमासान सुरू आहे. मराठा प्रवर्गाला कुणबीमधून आरक्षण पाहिजे, तर ओबीसी प्रवर्गाला मराठ्यांच्या ओबीसीकरणाला तीव्र विरोध आहे. राजकीय आरोप-प्रत्यारोप तीव्र होत आहेत. सरकारच्या हैद्राबाद गॅझेटर लागू करण्याच्या शासन निर्णयाविरोधात ओबीसीमधील काही घटकांनी न्यायालयात याचिका दाखल केल्या आहेत. दुसरीकडे लोकप्रिय योजनांमुळे सरकारी तिजोरीत खडखडाट असतानाही नोकऱ्यांची उपलब्धता आणि रोजगारावर चर्चाच होताना दिसत नाही. काही शासनकर्त्यांना व राजकारण्यांना आरक्षण कायमचे संपवायचे असल्याने त्यांनी मराठा-ओबीसी, ओबीसी-आदिवासी, आदिवासी-धनगर, दलित- मराठा असा संघर्ष पेटवण्यात व तो धुमसत राहण्यात धन्यता मानली आहे, या शंकेला वाव आहे.

कायद्याने आरक्षण देतानाही ५० टक्क्यांच्या आतच अठरापगड जाती, इतर मागासवर्गीय, एससी, एसटी यांना सामावून घेऊन राहिलेल्या ५० टक्क्यांमध्ये उच्च जाती, उच्च विद्याविभूषित लोकं, खुला प्रवर्ग यांना सामावून घेऊन त्यांच्या प्रगतीचा मार्ग मोकळा ठेवला आहे. म्हणूनच जो उच्च जातीत असेल, जो जास्त मेहनत करेल, त्यांना कायद्याने ५० टक्के वाटा खुला ठेवलेला आहे. वरच्या वर्गासाठी ईडब्ल्यूएस कोटाही राखीव ठेवला आहे. ५०-५० टक्के वाटा दोन्ही 'आहे रे' आणि 'नाही रे' वर्गासाठी कायम आहे. आरक्षणामुळे घोड्यांच्या स्पर्धेत लायकी नसलेले पुढे जात आहेत किंवा आम्हाला फक्त शिक्षणासाठी आरक्षण पाहिजे, बाकी आमची बरोबरी करायला सहा पिढ्या जातील असा युक्तिवाद केला जात आहे; मात्र आरक्षण नसते तर दुर्बल घटक कायम उच्च जातींच्या ओझ्याखाली दबून राहिला असता, हेही वास्तव आहे. आपण संविधानाने दिलेल्या समान न्याय आणि समान अधिकार या तत्त्वाचा स्वीकार केला पाहिजे. जे वर्ग मागास आहेत, जे अजूनही शिक्षणाच्या आणि विकासाच्या मुख्य प्रवाहात आलेले नाहीत, त्यांना सोबत घेऊन चालणे हे आर्थिक, सामाजिक आणि राजकीयदृष्ट्या विकसित वर्गाचे व सर्वांचेच काम आहे. केवळ जातीपातीच्या चष्म्यातून त्याकडे पाहता दुर्बल घटक म्हणून पाहिले पाहिजे आणि विकासाची संधी त्यांना दिली पाहिजे. ''आरक्षण नको किंवा आर्थिक निकषांवर आरक्षण द्या'' असे सांगणारा एक मोठा वर्ग अस्तित्वात आहे. वर्णव्यवस्थेचा वृथा अभिमान आणि जातींचा स्वाभिमान यातून हे प्रकट होत आहे. भारतीय राज्यघटनेत आर्थिकदृष्ट्या आरक्षणाची तरतूद नाही. सन २०१९च्या निवडणुकीत विद्यमान केंद्र सरकारने खुल्या प्रवर्गासाठी व उच्च जातींसाठी आर्थिकदृष्ट्या मागास आरक्षणाची घोषणा केली होती. त्यानुसार सरकारने १०३व्या घटनादुरुस्तीद्वारे खुल्या प्रवर्गासाठी १०टक्के आरक्षण दिले. सर्वोच्च न्यायालयाने तीन-दोन अशा बहुमताने नोव्हेंबर २०२२ रोजी या आरक्षणाच्या वैधतेला मंजुरी दिली. संविधानाने दिलेले सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास असे जातनिहाय आरक्षण हटवून सर्वांनाच केवळ आर्थिकदृष्ट्या मागास हा निकष लावून आरक्षण द्यायचे झाल्यास आरक्षणाची टक्केवारी ४० ते ७० टक्क्यापर्यंत पोहोचू शकते. सध्याच्या आर्थिक निकषानुसार, ज्यांचे वार्षिक उत्पन्न आठ लाखांपेक्षा कमी आणि जमीन पाच एकरपेक्षा कमी आहे, त्यांना आर्थिकदृष्ट्या मागास प्रवर्ग समजले जाते. त्यानुसार १० टक्के ईडब्ल्यूएस आरक्षणाची तरतूद केलेली आहे. हा निकष सर्वांनाच लावावा लागेल. इंद्रा सहानीविरुद्ध भारत सरकार आणि इतर खटल्यांमध्ये आरक्षणाची मर्यादा ५० टक्क्यांच्या वर वाढवता येत नाही, असे स्पष्टपणे नमूद केलेले आहे. आरक्षणासंदर्भात खुल्या प्रवर्गातील आर्थिक दुर्बल आणि मागासवर्गीय आर्थिक दुर्बल यांची तुलना होऊ शकत नाही. एखादा ब्राह्मण समाजातील व्यक्ती आर्थिकदृष्ट्या दुर्बल असेल, तरी तो सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास ठरत नाही. स्वातंत्र्याच्या आधीपासून चालत आलेली वर्णव्यवस्था याला कारणीभूत आहे. मनुचे भूत आपण जोपर्यंत गाडत नाही तोपर्यंत सामाजिक समानता अशक्य आहे. जेव्हा जातीपातीच्या भिंती तुटून पडतील, सामाजिक, सांस्कृतिक, वैचारिकदृष्ट्या लोक एकत्र येतील तेव्हाच हे शक्य आहे.

राज्यात- देशात जातधर्मावरून सुरू असलेले वाद तत्कालीन फायद्याचे असले, तरी दीर्घकाळ नुकसान करणारे आहेत. आजच्या घडीला प्रत्येक समाजघटक आरक्षणाचे लाभ घेत आहे. त्यामुळे आरक्षणाच्या नावाने बोटं मोडून चालणार नाही. उलट आरक्षणावरून पडलेली फूट बुजवावी लागेल. सरकारलाच त्यात पुढाकार घ्यावा लागेल. आरक्षण नको असेल तर सर्वांना समान संधी, मोफत शिक्षण, आरोग्य, नोकऱ्या व रोजगाराच्या संधी उपलब्ध करून द्याव्या लागतील. सर्वच पातळ्यांवर सामाजिक समता प्रस्थापित करावी लागेल.

# आज जरुड येथे आई नवसाई देवी नवरात्र कीर्तन महोत्सवाचे आयोजन


## आज ह.भ.प शांतिब्रह्म नवनाथ महाराज यांचे कीर्तन

बीड । प्रतिनिधी

**तालुक्यातील जरुड (ता. बीड) येथे सर्व भाविक भक्तांच्या उपस्थितीत व विविध संत-महंतांच्या आशिर्वादाने आई नवसाई देवी नवरात्र कीर्तन महोत्सव सोमवारी (दि.२२ सप्टेंबर) उत्साहात सुरुवात होत आहे.हा महोत्सव मंगळवार दि. ३० सप्टेंबरपर्यंत चालणार आहे.**

या कीर्तन महोत्सवाचे उद्घाटन ह.भ.प. शांतीब्रह्म नवनाथ महाराज (गोरक्षनाथ टेकडी) व ह.भ.प. अखंडानंद गिरीजी महाराज (श्रीक्षेत्र भवानीगड) यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित केला आहे. या महोत्सवात राज्यभरातील मान्यवर कीर्तनकार व संत सहभागी होत असून, भाविक भक्तांसाठी अध्यात्मिक मेजवानी उपलब्ध झाली आहे. या कार्यक्रमात ह.भ.प. स्वरमुर्ती रामेश्वर महाराज शास्त्री (लोणी शहाजनपूर), ह.भ.प. प्रतिभाताई गायकवाड,





ह.भ.प. भागवताचार्य नवनाथ महाराज नाईकवाडे, ह.भ.प. युवाकीर्तनकार माऊली महाराज, ह.भ.प. बालकीर्तनकार सोहम महाराज सातपुते, ह.भ.प. सिताताई आवाड, ह.भ.प. भगवंत महाराज पुरी, ह.भ.प. गणेश महाराज लोंढे यांच्यासह अनेक मान्यवर कीर्तनकारांचे कीर्तन सेवा होणार आहे. तसेच बुधवार दि. १ ऑक्टोबर २०२५ रोजी ह.भ.प.परमपूज्य गुरुवर्य महंत लक्ष्मण महाराज मेंगडे श्री क्षेत्र बंकट स्वामी मठ संस्थान नेकनूर आळंदी पंढरपूर यांच्या काल्याच्या कीर्तनाने सांगता होणार आहे. तसेच या महोत्सवात विविध भजनी मंडळे, आराधी मंडळे व महिला बचत गट सहभागी होणार असून, कीर्तन-भजन-आराद्याचा अखंड जलसा रंगणार आहे. संघर्षयोध्दा मा. श्री. मनोज दादा जरांगे पाटील व अनेक मान्यवर संत-महंतांचे मार्गदर्शनही लाभणार आहे. या महोत्सवाचे आयोजन समस्त गावकरी मंडळींनी केले असून, गावातील तरुण, मंडळी व महिला बचत गट मोठ्या उत्साहाने तयारीत सहभागी झाले आहेत. या महोत्सवाच्या निमित्ताने भक्तिमय वातावरण निर्माण झाले असून, हजारो भाविक भक्तांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत आहे.या कीर्तन महोत्सवाचे आयोजन माऊली महाराज जरुडकर यांच्या नियोजनाखाली व गावकऱ्यांच्या सक्रिय सहभागात करण्यात आले असून, त्यामुळे कार्यक्रमात भक्तिमय वातावरण अधिक उत्स्फूर्त झाले आहे.

# जालन्यात गुणरत्न सदावर्तेंच्या गाडीवर हल्ल्याचा प्रयत्न

जालना । प्रतिनिधी

मराठा आरक्षणाला सातत्याने विरोध करणारे आणि मनोज जरांगे यांच्याविरोधात आक्रमक भूमिका घेणारे ॲडव्होकेट गुणरत्न सदावर्ते यांच्या गाडीवर जालन्यात मराठा आंदोलकांनी हल्ला केल्याचा प्रकार घडला. गुणरत्न सदावर्ते हे रविवारी जालना येथील धनगर उपोषण आंदोलनाला भेट जाण्यासाठी जात होते. त्यांच्या गाड्यांचा ताफा रस्त्यावरुन जात असताना पोलिसांनी कडेकोट बंदोबस्त ठेवला होता. यावेळी मराठा आंदोलक रस्त्याच्या दुतर्फा उभे होते. याठिकाणी पोलीस बंदोबस्त होता. आंदोलकांना पाहून पोलीस त्यांच्यापर्यंत पोहोचले होते. यानंतर आंदोलक गाडीवर धावून जातील, असे पोलिसांना वाटले नव्हते. मात्र, एके ठिकाणी आंदोलकांनी पोलिसांना चुकवून गुणरत्न सदावर्ते यांची गाडी गाठण्यात यश मिळवले. या आंदोलकांनी गुणरत्न सदावर्ते यांच्या गाडीवर धावून जात काचेवर फटके मारले. हा प्रकार पोलिसांच्या लक्षात येतात त्यांनी मराठा आंदोलकांना तातडीने पकडले. मात्र, तोपर्यंत दोन-तीन मराठा आंदोलकांनी गुणरत्न सदावर्ते यांच्या लिमोझिन गाडीच्या काचेवर फटके मारले होते. यानंतर पोलिसांनी सर्व मराठा आंदोलकांना ताब्यात घेतले आहे. यामध्ये काही मनोज जरांगे पाटील समर्थक विश्वंभर तिरुखे यांचाही समावेश असल्याचेही



समजते. त्यामुळे आता पोलीस या आंदोलकांवर काय कारवाई करणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. या हल्ल्यात वकील गुणरत्न सदावर्ते यांच्या गाडीचे किरकोळ नुकसान झाले आहे.

मनोज जरांगे पाटील यांनी यापूर्वीच मराठा आंदोलकांवर दाखल असलेले गुन्हे मागे घेण्याची मागणी केली होती. अशात आता गुणरत्न सदावर्तेंच्या गाडीवर धावून जाणाऱ्या मराठा आंदोलकांवर पोलिसांनी गुन्हे दाखल करुन कारवाई केल्यास मनोज जरांगे पाटील आक्रमक होऊ शकतात. मराठा आरक्षण आंदोलन ऐन भरात असताना राज्यातील अनेक नेते मनोज जरांगे पाटील यांच्याविरुद्ध तोंडातून शब्द काढायची हिंमत करत नव्हते. त्यावेळी ॲडव्होकेट गुणरत्न सदावर्ते यांनी अत्यंत आक्रमक भाषेत मनोज जरांगे पाटील यांचा समाचार घेतला होता. त्यांनी मुंबईतील मराठा आंदोलनालाही विरोध केला होता. मनोज जरांगे पाटील यांची मागणी संवैधानिक नसल्याचे सांगत गुणरत्न सदावर्ते यांनी सातत्याने मराठा आरक्षणाच्या मागणीला विरोध केला होता. यापूर्वी मनोज जरांगे पाटील अंतरवाली सराटीत उपोषणाला बसले असताना काही मराठा आंदोलकांनी गुणरत्न सदावर्ते यांच्या मुंबईतील घराबाहेर असणाऱ्या गाडीच्या काचा फोडल्या होत्या. त्यानंतर मराठा आंदोलकांकडून गुणरत्न सदावर्ते यांना अनेकदा इशारेही देण्यात आले होते. मात्र, गुणरत्न सदावर्ते यांनी मनोज जरांगे पाटील यांच्या भूमिकेला विरोध करणे सुरुच ठेवले होते.

# पत्रकार सुरक्षा समितीच्या बीड जिल्हाध्यक्षपदी पठाण तर माजलगाव तालुकाध्यक्षपदी चांदणे

माजलगाव । प्रतिनिधी

पत्रकार सुरक्षा समिती महाराष्ट्र संघाच्या बीड जिल्हाध्यक्षपदी वाजेद पठाण यांची तर माजलगाव तालुकाध्यक्ष पदी परमेश्वर चांदणे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे.

पत्रकार सुरक्षा समिती महाराष्ट्र संघाचे संस्थापक अध्यक्ष यशवंत पवार यांच्या आदेशानुसार व मार्गदर्शनाखाली बीड जिल्हाध्यक्ष पदी वाजेद पठाण तर माजलगाव तालुकाध्यक्षपदी परमेश्वर चांदणे यांची निवड करण्यात आलेली आहे.मागील अनेक वर्षापासून पत्रकारांच्या विविध प्रश्नांवर पुढाकार घेऊन वाचा फोडण्याचे काम वाजेद पठाण यांनी केले आहे आणि पत्रकारांचे प्रश्न पत्रकार गृहनिर्माण संस्था,आधीस्विकृती कार्ड,घरकुल,पत्रकारावर होत असलेले हल्ले या अनेक विविध विषयावर महाराष्ट्र राज्याच्या मुख्यमंत्र्याकडे सुरक्षा समिती महाराष्ट्राच्या वतीने याविषयी प्रश्न मांडण्याचे प्रयत्न करणार असे विद्यमान बीडजिल्हा अध्यक्ष वाजेद पठाण यांनी या नियुक्तीवेळी सांगितले आहे या नियुक्तीमुळे सर्वांच्या वतीने कौतुकाची थाप मिळत आहे पत्रकार सुरक्षा समिती संघाच्या माजलगाव तालुकाध्यक्ष पदी परमेश्वर चांदणे, सचिवपदी अखिल शेख,उपाध्यक्षपदी किसन पवार,यांची नियुक्ती पत्रकार सुरक्षा समिती बीड जिल्हाअध्यक्ष वाजेद पठाण यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आलेली आहे. या नियुक्ती झालेल्या पदाधिकाऱ्यांना यावेळी नारायण होके पाटील,नुमान चाऊस, पत्रकार ज्योतिराम पांढरपोटे,परमेश्वर सोळंके,अनंत घडसिंगे खय्युम पठाण,विजय पवार अखिल कुरेशी यांनी पत्रकार सुरक्षा समितीच्या नियुक्ती झालेल्या पदाधिकाऱ्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहे.

# मराठा आंदोलक प्रवीण सोनवणे यांच्या कुटुंबीयाला मुख्यमंत्र्याकडून दहा लाखाची मदत

आष्टी । प्रतिनिधी

मराठा आरक्षणासाठी आत्मबलिदान देणारे आष्टी तालुक्यातील शेरीचे सुपुत्र, शहीद प्रवीण दिलीप सोनवणे यांच्या कुटुंबाला मुख्यमंत्री सहायता निधीतून मंजूर दहा लाख रुपयांचा धनादेश आ.सुरेश धस,तहसीलदार वैशाली पाटील यांच्याकडुन सुपूर्द करण्यात आला.

मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी संघर्ष योद्धा मनोज दादा जरांगे पाटील यांनी उभारलेल्या लढ्यामध्ये शहीद झालेल्या बांधवांना शासनाकडून आर्थिक मदत मिळत असल्याने



त्यांच्या कुटुंबाला आधार देण्याचे काम मनोज दादांच्या माध्यमातून होत आहे. मुख्यमंत्री सहायता निधीतून मिळालेल्या या मदतीबद्दल आम्ही सरकारचे, मान्यवर अधिकारी व मित्रपरिवाराचे मनःपूर्वक आभार मानतो. मुंबईत झालेल्या मराठा आरक्षण मोर्चात माननीय मराठा योद्धा मनोज दादा जरांगे पाटील यांच्या नेतृत्वामुळे हे शक्य झाले. त्यांचे उपकार आम्ही आयुष्यभर विसरणार नाही, त्यांच्या ऋणात राहू. दरम्यान, मुख्यमंत्री उपसमिती प्रमुख राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिलेल्या आश्वासनानुसार ही मदत वेळेत पोहोचल्याचे सांगण्यात आले असल्याचे दीपक सोनवणे यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. शहीद प्रवीण यांच्या बलिदानामुळे मराठा समाजाच्या न्याय्य मागणीला नवे बळ मिळाले असून, त्यांच्या कुटुंबाला मिळालेली ही मदत समाजातील सर्वांसाठी प्रेरणादायी ठरली आहे. या वेळी आ.सुरेश धस तहसीलदार वैशाली पाटील ,प्रशिक्षणार्थी तहसीलदार सोमेश मोहिते,नायब तहसीलदार भगीरथ धारक,सुनील रेडेकर आदी मान्यवर उपस्थित होते. सोमवारी आष्टी तालुक्यामध्ये महाप्रलयकारी आलेल्या पु ल रामध्ये धामणगाव येथील अफरोज बागवान व घाटा पिंपरी येथील श्रावण शिंदे या दोघांचा मृत्यू झाला होता त्यांच्या कुटुंबीयांना शासनाकडून प्रत्येकी चार-चार लाख रुपयांच्या धनादेश तहसीलदार वैशाली पाटील व आमदार सुरेश धस यांच्या हस्ते देण्यात आला. या लोकांना मदत मिळावी या साठी मराठवाडा भुषण आमदार सुरेश आण्णा धस शासन दरबारी पाठपुरावा केला.

## पान ६ वरून...

### गेवराई बाजार समितीच्या

अडीच-अडीच वर्षांचे आश्वासन त्यावेळी देण्यात आले होते, म्हणून आता हे राजीनामे झाल्याची चर्चा गेवराई तालुक्यात आहे. राजीनाम्यामुळे रिक्त झालेल्या सभापती आणि उपसभापती पदाच्या निवड प्रक्रियेकडे तालुक्याचे लक्ष लागले आहे. आ.विजयसिंह पंडित आणि माजी आमदार अमरसिंह पंडित कृषी उत्पन्न बाजार समितीच्या माध्यमातून कोणते सामाजिक समीकरण आखणार आहेत ? असा प्रश्न राजकीय जाणकारांना पडला आहे. गेवराई कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभापतीपदासाठी अनेकांनी आपला दावा केला असून या पदासाठी मागील अनेक दिवसांपासून मोर्चे बांधणी सुरू आहे. आज होणाऱ्या सभापती आणि उपसभापती पदाच्या निवडणुकीकडे सर्वांचे लक्ष वेधले आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक पार्श्वभूमीवर या दोन्ही पदांच्या आजच्या निवडीला महत्त्व आहे. गेवराई कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक अशोक नाईकवाडे, पांडुरंग मुळे, जगन्नाथ काळे, रामलाल धस, हनुमान कोकणे, महारुद्र चाळक, बाबासाहेब जाधव, रमेश साखरे, अशोक खरात, रमेश खोपडे, मंगेश कांबळे, दिलीपकुमार जैन, राम चाळक, कृष्णा राऊत, सौ.वैशाली जाधव, श्रीमती लक्ष्मीबाई पवार यांचा विद्यमान संचालक मंडळात समावेश आहे. यांपैकी दोहोंची सभापती आणि उपसभापती पदावर वर्णी लागण्याची शक्यता आहे. सभापती आणि उपसभापती यांचे राजीनामे मंजुर झाल्यानंतर गेवराई तालुक्यात राजकीय हालचालींना वेग आला असून इच्छुकांनी मोर्चेबांधणीला सुरुवात केली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर माजी आमदार अमरसिंह पंडित आणि आ.विजयसिंह पंडित कोणते सामाजिक समीकरण या माध्यमातून करणार आहेत ? याची राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा आहे.

---------

### ना. पंकजाताई मुंडेंना

भक्तीगडावर दरवर्षीच्या प्रथे परंपरेप्रमाणे यंदाही आपला दसरा मेळावा आयोजित करण्यात आला आहे. या मेळाव्यास दरवर्षी आपण उपस्थित राहून मार्गदर्शन करत असता. यावर्षी देखील ०२ ऑक्टोबर रोजी होणाऱ्या दसरा मेळाव्यास आपण यावे आणि उपस्थित जनसमुदायाला मार्गदर्शन करावे अशी आम्हा सर्व पंचक्रोशीतील ग्रामस्थांची इच्छा आहे. या शिष्टमंडळात सर्वश्री मुरलीधर मुकादम सानप,भागवत अप्पा सानप,जाणू दादा सानप,परमेश्वर खटके, जगनाथ सप्रे,तुळशीदास सानप,किसन सानप,मुरली नाना सानप,अश्रूबा दादा सानप, पांडुरंग सानप,राजु शिंदे,अनिल सानप,गणेश सानप आदी उपस्थित होते.

---------

### ओबीसी मेळाव्याच्या

बैठकीस ओबीसी - भटके विमुक्त समाजातील सर्व कार्यकर्ते व ओबीसी समाज बांधव यांनी आवर्जून उपस्थित रहावे असे आवाहन सकल ओबीसी समाजाच्या वतीने करण्यात आले आहे. या बैठकीला माजी आ.नारायणराव मुंढे, महात्मा फुले समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस - ड.सुभाषभाऊ राऊत, सत्संग मुंढे, जे.डी.शहा, प्रा.पी.टी.चव्हाण, रासपचे परमेश्वर महाराज वाघमोडे यांच्यासह विविध सामाजिक संघटनेचे पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. तरी उद्या आयोजित केलेल्या बैठकीला गेवराई तालुक्यातील सर्व ओबीसी कार्यकर्ते - पदाधिकारी तसेच ओबीसी समाज बांधव यांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन सकल ओबीसी समाजाच्या वतीने ओबीसी समन्वयक सुघोष मुंढे सर व महात्मा फुले समता परिषदेचे गेवराई तालुकाध्यक्ष बापू गाडेकर यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकारद्वारे केले आहे.

---------

### माजलगाव शहरात

१६ सप्टेंबर ते १८ सप्टेंबर च्या दरम्यान ही घटना घडली.या धाडसी चोरी मध्ये लड्डा यांचे ३८ ग्राम वजनाच्या चार सोन्याच्या अंगठ्या,२० ग्राम वजनाच्या सोन्याचे ४ नग कानातले जोड,१० ग्रामचे सोन्याचे काफस,३ ग्राम वजनाचे २ सोन्याचे नाकातले,५ ग्रामची सोन्याची चैन, १५० ग्राम वजनाचे ३ पैंजण,८५० ग्राम चे चांदीचे ताट,५० ग्राम वजनाचा चांदीचा तांब्या,१०० ग्राम वजनाचे चांदीच्या वाट्या, १८० ग्राम वजनाचे ९ चांदीचे शिक्के,४०० ग्राम वजनाचा चांदीचा वळा,६० ग्राम वजनाचा चांदीचा पांचपाळा व इतर साहित्य व नगदी २५,०००/ रु असा आजच्या बाजार भावा प्रमाणे अंदाजे १२-१५ लाख रुपयांचा ऐवज चोरांनी लंपास केला असल्याची फिर्याद दिली आहे. या प्रकरणी शहर पोलिसात ३४०/२०२५ गुन्हा नोंद क्रमांक भारतीय न्याय संहिता ३३१(४),३०५ अ नुसार जबरी चोरीचा गुन्हा दाखल झाला असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक केरबा माकणे हे करत आहे.

## पान १ वरून...

### राज्यातील पडीक जमिनही

७१ लाख आहे. मात्र, यातील सर्वच जण शेती करतात असे नाही. शहरांलगतच्या अनेक गावांमध्ये तुकड्यांमध्ये शेती नावावर आहे. प्रत्यक्षात हे क्षेत्र बिगर शेती नसल्याने ते अजूनही शेती म्हणूनच अधिकार अभिलेखात नोंदले गेले आहे. त्यामुळेच कायम पड किंवा अकृषक क्षेत्र रेकॉर्डवर आणण्याची मोहिम सुरू झाली आहे.

-------

### धनगरांना फसवणाऱ्यांची

२४ तारखेपर्यत सुरू राहील. २४ तारखेला धनगर समाजाचा इशारा मोर्चा आहे. या मोर्चानंतर देखील सरकार खबरदार झाले नाही तर धनगर समाजाला फसवणाऱ्यांचे घरे जाळून टाका, असे आवाहन बोऱ्हाडे यांनी केले आहे. शिवाय २४ तारखेनंतर नेपाळमध्ये झाले त्या पलीकडे महाराष्ट्रात घडवा असेही बोऱ्हाडे म्हणाले. दरम्यान, धनगर समाजाला एसटीचे आरक्षण मिळावे या मागणीसाठी जालन्यात दिपक बोऱ्हाडे यांचे आमरण उपोषण सुरु आहे. रविवारी त्यांच्या आमरण उपोषणाचा पाचवा होता. आता त्यांची तब्येत काहीशी खालवली आहे. २४ तारेखेपर्यंत धनगर समाजाला एसटी प्रवर्गातून आरक्षण द्यावे अन्यथा उद्रेक होईल, असा इशारा आंदोलक दिपक बोऱ्हाडे यांनी दिला आहे.

---------

### आजपासून घर, वाहन,

नव्या जीएसटी दरांमुळे दैनंदिन वस्तू, औषधे, हॉटेल राहणी आणि वाहन खरेदी स्वस्त होईल, ज्यामुळे 'नागरिक देवो भव' या मंत्राची खरी अंमलबजावणी होईल, असं पंतप्रधान मोदी यांनी सांगितले. नरेंद्र मोदी म्हणाले, ''गेल्या ११ वर्षांत २५ कोटी लोक गरीबीमुक्त झाले आणि 'नियो-मध्यमवर्ग'मध्ये सामील झाले. त्यांच्या स्वप्नांना पंख देण्यासाठी आम्ही १२ लाख रुपयांपर्यंत उत्पन्न करमुक्त केला आहे. आता जीएसटी सुधारणांमुळे दैनंदिन वस्तू, प्रवास आणि हॉटेल राहणी स्वस्त होईल. हे गरीब, मध्यमवर्ग, शेतकरी, महिला, विद्यार्थी आणि युवकांसाठी 'डबल बोनान्झा' आहे.'' या बदलांमुळे लोकांना २.५ लाख कोटी रुपयांची बचत होईल, असे त्यांनी सांगितले. हे नवे दर सोमवार (२२ सप्टेंबर) पासून, म्हणजे नवरात्र सुरू होताच लागू होतील. मोदी म्हणाले, ''मातृशक्तीशी निगडित असलेल्या या सुधारणांमुळे स्वदेशी भारताकडे मोठा टप्पा साध्य होईल.

----------

### २०४७ पर्यंत नरेंद्र मोदीच

पुढे बोलताना त्यांनी स्पष्ट केले की, नरेंद्र मोदी येत्या अनेक वर्षांसाठी पंतप्रधान राहतील. ते निर्विवाद आहेत आणि ते तसेच राहतील. येणाऱ्या अनेक निवडणुकांमध्ये पंतप्रधानपदाची जागा रिक्त राहणार नाही, असेही त्यांनी सांगितले. राजनाथ सिंह यांनी पंतप्रधान मोदींशी असलेल्या त्यांच्या संबंधांवरही चर्चा केली. त्यांनी स्पष्ट केले की, पंतप्रधान मोदींशी त्यांचे जवळजवळ ३५ वर्षांपासूनचे संबंध आहेत. आम्ही पहिल्यांदा झाशीमध्ये भेटलो होतो. तेव्हापासून आणि आजपर्यंत अनेक बदल दिसून आले आहेत. विशेषतः पंतप्रधान झाल्यापासून त्यांनी अनेक जटिल निर्णय घेतले आहेत, जे कोणीही घेण्याचा विचार करणार नाही. ते सर्वात मोठ्या आव्हानांना तोंड देऊनही मागेपुढे पाहत नाहीत. ही त्यांची क्षमता आहे, असे राजनाथ सिंह म्हणाले. जगातील अनेक प्रमुख नेते जागतिक घडामोडींवर नरेंद्र मोदी यांचा सल्ला घेतात. मी कधीही इतर कोणत्याही पंतप्रधानांना त्यांच्या वाढदिवसाच्या दिवशी जागतिक नेत्यांकडून इतके वैयक्तिक फोन आलेले पाहिलेले नाहीत, असे राजनाथ सिंह म्हणाले. संरक्षणमंत्र्यांनी हे देखील सांगितले की भाजपने २०१३ मध्ये नरेंद्र मोदींना प्रचार समन्वयक म्हणून नियुक्त केले आणि नंतर संसदीय मंडळाच्या पाठिंब्याने त्यांना पंतप्रधानपदाचे उमेदवार म्हणून नियुक्त केले. ते म्हणाले की ज्येष्ठ नेते लालकृष्ण अडवाणी यांचा कोणताही अनादर झाला नाही; त्यांचा अजूनही खूप आदर केला जातो आणि तो तसाच राहील. तथापि, देशाने मोदींच्या नेतृत्वाची मागणी केली, असे राजनाथ सिंह म्हणाले. २०१४ च्या निवडणूक प्रचारादरम्यान, आम्ही अनेकदा एकत्र प्रवास केला. मी नरेंद्र मोदी यांना सांगितले होते की त्यांना पूर्ण बहुमत मिळेल, परंतु त्यांना स्वतःला यावर पूर्ण विश्वास नव्हता, असे राजनाथ सिंह म्हणाले. मत चोरीचे विरोधकांचे आरोप निराधार असल्याचे म्हणून त्यांनी फेटाळून लावले. ते म्हणाले, जर विरोधकांकडे पुरावे असतील तर त्यांनी न्यायालयात जावे.

--------

### राज्यात ५,५०० सहाय्यक

जाईल आणि पुढील वर्षी मार्चपूर्वी ५,५०० सहाय्यक प्राध्यापकांच्या रिक्त जागा भरल्या जातील, असे ते म्हणाले. विद्यापीठांमध्ये ७०० सहाय्यक प्राध्यापकांची भरती करण्यासाठी यापूर्वी मंजुरी देण्यात आली होती, परंतु तत्कालीन राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी वेगळी पद्धत सुचविल्यामुळे ही प्रक्रिया पूर्ण होऊ शकली नाही. राधाकृष्णन यांची उपराष्ट्रपतीपदी नियुक्ती झाली असल्याने, हे प्रकरण नवीन राज्यपाल आचार्य देवव्रत यांच्याकडे नेले जाईल. परदेशी विद्यार्थ्यांना आकर्षित करण्यासाठी विद्यापीठांना बळकटी द्यावी असे मंत्री म्हणाले. या वर्षी एका एजन्सीची नियुक्ती करण्यात आली होती ज्याद्वारे ६५ देशांतील ४,००० विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला होता, परंतु सर्वाधिक पसंती पुणे आणि मुंबईला मिळाली.

------

### मुंबई महापालिकेसाठी ठाकरे

मनसे यांच्यातील युती आता केवळ औपचारिकता असल्याने, दोन्ही पक्षांच्या नेत्यांना अशा जागांच्या यादी तयार करण्यास सांगण्यात आले आहे, असे त्यांनी सांगितले. शिवसेना (यूबीटी) आणि मनसे यांच्यातील औपचारिक युती दिवाळीच्या आसपास जाहीर केली जाऊ शकते, जेव्हा महापालिका निवडणुकीचा पहिला टप्पा होण्याची शक्यता आहे. राज्यातील उर्वरित भागात, दोन्ही पक्ष एकमेकांच्या ताकदीच्या आधारे निर्णय घेतील. ठाणे, नाशिक आणि कल्याण-डोंबिवली प्रदेशात शिवसेना (यूबीटी) आणि मनसेचा प्रभाव आहे. वादाचे मूळ असे क्षेत्र असण्याची शक्यता आहे जिथे सेना आणि मनसे दोन्ही पक्षांचे वर्चस्व आहे. त्यामुळे दादर-माहीम, लालबाग-परेल-सेवरी, विक्रोळी, दिंडोशी, घाटकोपर पश्चिम, दहिसर आणि भांडुप यांसारख्या बालेकिल्ल्यांच्या जागा समान प्रमाणात विभागल्या जाण्याची शक्यता आहे. या दोन्ही क्षेत्रांमध्ये प्रभाव आहे. शहराच्या उर्वरित भागात हे प्रमाण ६०:४० असण्याची शक्यता आहे. ज्यामध्ये ६० टक्के जागा सेना (यूबीटी) ला आणि उर्वरित जागा आमच्याकडे जातील, असे मनसे नेत्याने सांगितले.या व्यवस्थेनुसारही, मुस्लिमबहुल भागातील जागा सेना (यूबीटी) लढवण्याची शक्यता आहे.

---------

### प्रॉपर्टी साठी आईची निर्घुण हत्या!

आईकडे (मयत सुनंदा ज्ञानोबा कांगणे, वय अंदाजे ५० वर्ष, रा (भोजनकवाडी) सतत घर नावावर करून देण्याची मागणी करत होता. मात्र, मयत हिने घर तिच्या नावेच ठेवले. त्यामुळे आरोपी चंद्रकांत याने रागाच्या भरात दि. २० सप्टेंबर रोजी सकाळी ९.३० वाजता आईच्या डोक्यात कुरुंदाचा दगड घालून गंभीर दुखापत केली. जखम गंभीर असल्याने त्यातच तिचा मृत्यू झाला. या प्रकरणी परळी ग्रामीण पोलीस ठाण्यात आरोपीविरुद्ध गु.र.नं. ४०५ / २०२५, कलम १०३ (१) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी मुलाला पोलीसांनी अटक केली आहे. अधिक तपास पो.नि. सय्यद हे करीत आहेत. दरम्यान, जन्मदात्री आईसारख्या मायेच्या व्यक्तीची केवळ मालमत्तेच्या वादातून घडलेली हत्या ही समाजातील नैतिक अधःपतनाचे उदाहरण असुन, या घटनेने संपूर्ण बीड जिल्ह्यात खळबळ माजली आहे.

cmyk

राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
सोमवार दि. २२ सप्टेंबर २०२५





दिंद्रुड :- अखील भारतीय वीरशैव शिवाचार्य संस्था संस्थेच्या विभागीय सचिव पदी श्री श्री श्री १०८ ष.ब्र. श्रीगुरू विरूपाक्ष शिवाचार्य महाराज,मानूरकर यांची सचिव पदी नुकतीच निवड करण्यात आली. याबाबत दिंद्रुड कृषक सेवा सहकारी सोसायटी माजी चेअरमन राम उबाळे, पत्रकार संतोष स्वामी, नवनाथ कांबळे, विशाल गौडर,राजु पारेकर यांनी मानुर मठास सदिच्छा भेट देत अभिनंदन करत सत्कार केला.

## थोडक्यात...

### जिल्हास्तरीय ज्युदो स्पर्धेत शिवानी गर्जेने पटकवला प्रथम क्रमांक

गेवराई ( प्रतिनिधी)



:- तालुक्यातील शेकटा येथिल कु, शिवानी ज्ञानेश्वर गर्जे ईयत्ता ६ वर्गात शिकणारी हीने जिल्हास्तरीय ज्युदो शालेय स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावीत, विभागीय ज्युदो स्पर्धा साठी तिची निवड झाली आहे १२ वर्ष वयोगाटात अतिशय उत्कृष्ट खेळ करत तिने हे नावलौकिक मिळवले आहे, यशाबद्दल तिचे तालुक्यातील अनेक जण अभिनंदन करत आहेत,

शिवानी गर्जे ही राजामाता जिजाऊ विद्यालयातील ती इयत्ता ६ वर्गाची विद्यार्थ्यांनी आहे, या ज्युदो खेळासाठी वडील ज्ञानेश्वर गर्जे सतत सराव घेवुन ते प्रोत्साहन देत असल्याने तिने हे यश संपादन केल्याचे तिने सांगितले,

### नंदकिशोर सजगणे यांना बंधूशोक

माजलगाव । प्रतिनिधी




तालुक्यातील तेलगव खु. येथील माजलगाव कृषि उत्पन्न बाजार समितीचे संचालक चे नंदकिशोर सजगणे यांचे लहाने बंधू गोविंद सजगणे हे हैदराबाद येथे इंजिअर म्हणून कार्यरत होते परंतू आपले कार्यलयीन काम आटोपुन दि १९ सप्टेंबर रोजी रात्री ८:०० वाजता त्यांचे रेल्वे मध्ये अपघाती निधन झाले असून त्यांचा अंत्यविधी दि २० सप्टेंबर रोजी ७:३० वाजता तेलगाव खु.ठिकानी त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले गोविंद हे गावात अत्यंत शांत संयमी म्हणून परिचित होते त्यांचे अवघे वयाच्या ३० व्या वर्षी अपघाती निधनाची वार्ता समजताच पंचक्रोशीतील नागरिकांनी व प्रतिष्ठित नागरिक यांनी यावेळी हळहळ व्यक्त केली त्यांच्या पच्यात आई,वडील,पत्नी,बहीण, दोन मुली असा परिवार असून ते बाजार समितीचे संचालक नंदकिशोर सजगणे यांचे लहान बंधू होत.

### रोषणपुरीत प्रति आमावस्या सोहळा

माजलगाव । प्रतिनिधी

तालूक्यातील रोषणपुरी येथील जागृत देवस्थान श्री बुआजी बुआ महाराज यांचा प्रति आमावस्या सोहळा मोठया उत्साहात संपन्न झाला.



पहाटे श्रींच्या अभिषेका नंतर भक्तांनी बुआजी बुआ महाराजांचे दर्शन घेतले. सकाळी ११:०० वाजता श्री. ह.भ.प संदीपान महाराज हासेगावकर यांचे सुश्राव्य किर्तन झाले.किर्तना नंतर महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. महाप्रसादाचे नियोजन श्री. हभप.नामदेव महाराज घाटुळ यांनी केले होते.या प्रति आमावस्या सोहळ्यात पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी किर्तन श्रवणाचा व महाप्रसादाचा लाभ घेतला. कार्यक्रम चैतन्यदायी करण्यासाठी सरपंच मुक्ताराम ताकट,आश्रुबा डांगे,मदनराव टेकाळे,वशिष्ठ डांगे, बालासाहेब ताकट, उत्तमराव मारगुडे, बाजीराव ताकट, उद्धवराव ताकट, श्याम डांगे, कैलासराव ताकट, दत्ता महाराज मारगुडे,सुखदेव डांगे,समस्त ग्रामस्थ व तरूण मंडळाने विशेष परिश्रम घेतले.

# माजलगाव तालुक्यात दहशत निर्माण करणाऱ्या गुंडाची हर्सूल कारागृहात रवानगी

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्हयातील सार्वजनिक सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी जिल्हयाचे पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांनी जिल्हयाची धुरा सांभाळल्या पासुन शर्थीचे प्रयत्न चालवले आहेत. बीड जिल्हयातील गुंडगिरीचे व गुन्हेगारीचे समुळ उच्चाटन करण्याचा उदात्त दृष्टीकोन डोळ्यासमोर ठेवुन कायद्या अंतर्गत बऱ्याच गुन्हेगारांवर व गुंडावर कारवाई करण्याचे योजिले आहे. त्यांना बीड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांची खंबीर साथ लाभली आहे. त्या अनुषधांने पो.अ. बीड यांचे सुचनेवरुन पो.नि. राहुल सुर्यतळ पोलीस ठाणे माजलगांव शहर यांनी दिनांक २३.०७.२०२५ रोजी इसम नामे नारायण रावसाहेब करपे वय ४५ वर्षे रा. शिवाजीनगर माजलगांव ता. माजलगांव जि. बीड याचे विरध्द कायद्याअंतर्गत स्थानबद्ध करण्याबाबतचा प्रस्ताव पोलीस अधीक्षक बीड यांच्या मार्फतीने जिल्हादंडाधिकारी बीड यांना सादर केला होता.

सदर स्थानबध्द इसमा विरुध्द पोलीस ठाणे माजलगावं शहर प्रलंबित खटल्यांमध्ये गैरहजर राहणे दंडाधिकाऱ्यांच्या आदेशाचे उल्लंघन करणे, अवैधरीत्या दारु विक्री करणे, महिलांची छेडाछाड करुन विनयभंग करणे, जिवे मारण्याच्या उद्देशान गंभीर दुखापत करणे, जबरी चोरी करणे, जिवे मारण्याच्या धमक्या देणे, शिवीगाळ करणे, रस्त्यात आडवणु मारहाण करणे वगैरे गंभीर स्वरुपाचे एकुण ०८ गुन्ह्याची नोंद पोलीस अभिलेखावर आहे. त्यापैकी ०७ गुन्हे न्यायप्रविष्ठ असुन ०१ गुन्हा पोलीस तपासावर आहे. तसेच नमुद इसमावर त्याने आपली वर्तनुक सुधारावी म्हणून यापुर्वी प्रतिबंधक कारवाई करण्यात आली होती. परंतु



सदर इसम हा प्रतिबंधक कारवाईस न जुमानता पुन्हा चढत्या क्रमाने गुन्हे करण्याची श्रृंखला चालुच ठेवुन होता. त्याची माजलगांव शहर व परीसरात प्रचंड दहशत आहे. त्याचे विरुध्द लोक फिर्याद देण्यास अथवा साक्ष देण्यास समोर येत नाहीत. तो सर्वसामान्य लोकांना त्रास देवुन दहशत निर्माण करुन, सार्वजनिक सुव्यवस्थेस बाधा पोहचवत होता.

सदर प्रकरणांत जिल्हादंडाधिकारी तथा जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी दिनांक २०.०९.२०२५ रोजी सदर प्रकरणाच्या अनुषंगाने एम.पी.डी.ए. कायद्याअंतर्गत आदेश पारीत करून सदर इसमास तात्काळ ताब्यात घेवून हर्सल कारागृह छ. संभाजीनगर येथे हजर करून स्थानबध्द करणे बाबत आदेश पारीत केले आहे. त्यावरुन पोलीस अधिक्षक बीड यांनी सदर इसमास तात्काळ ताब्यात घेवून कार्यवाही करण्याच्या सुचना पो.स्टे. माजलगांव शहर व पो. नि. स्थागुशा बीड यांना दिल्या होत्या. त्यावरुन गोपणीय खबऱ्याच्या आधारे पोनि राहुल सुर्यतळ यांनी ताबे पोलीस अंमलदार यांचे मार्फतीने आज दिनांक २१.०९.२०२५ रोजी ०३.२८ वा. सदर इसमास ताब्यात घेऊन त्यास योग्य पोलीस बंदोबस्तात हर्सल कारागृह, छ. संभाजीनगर येथे दिनांक २१.०९.२०२५ रोजी ०७.४० वा हजर करुन स्थानबध्द केले आहे. सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक नवनीत काँवत भापोसे, अपोअ अंबाजोगाई, श्री चेतना तिडके, उपविपोअ माजलगांव शैलेश गायकवाड पो.नि. शिवाजी बंटेवाड स्थागुशा बीड यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि. राहुल सुर्यतळ, पोउपनि केरबा माखने, महेश चव्हाण, सुनिल गवळी, माधव तोटेवाड सर्व पो.स्टे. माजलगांव शहर तसेच सपोउपनि अभिमन्यु औताडे, बाळु सानप, भागवत शेलार, गणेश मराडे सर्व नेमणुक स्थागुशा बीड यांनी केलेली आहे. भविष्यातही वाळुचा चोरटा व्यापार करणारे तसेच जिवनावश्यक वस्तुंचा काळाबाजार करणारे व्यक्ती यांचेवर व दादागिरी करणाऱ्या व खंडणी बहाद्दर धोकादायक गुंडावर तसेच मटका, लॉटरी जुगार खेळणाऱ्या व खेळविणाऱ्या जास्तीत जास्त कायदयाअंतर्गत कठोर कारवाई करण्याचे संकेत पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांनी दिले आहेत.

## कऱ्हेवडगाव येथे मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त सरपंच वंदना गायकवाड यांच्या हस्ते शालेय साहित्याचे वाटप

आष्टी । प्रतिनिधी

भारताचे लोकप्रिय व यशस्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ७५ व्या.वाढदिवसा निमित्त आ.सुरेश धस यांच्या संकल्पनेतुन आज मंगळवारी सकाळी मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त ध्वजारोहन झाल्यानंतर येथील जि.प.प्रा.शाळेतील विद्यार्थींना पेन वही,कंपास पेटी, शालेय साहित्य वाटप करण्यात आले.कडा कृ.उ.बा. समितीच्या संचालिका तथा क-हेवडगाव ग्रामपंचायतच्या सरपंच सौ.वंदना परिवंत गायकवाड यांच्या हस्ते हे शालेय साहित्य वाटप करण्यात आले.यावेळी सरपंच सौ. वंदनाताई परिवंत गायकवाड, ग्रामसेवीका दिपा गायकवाड,पोलीस




उपनिरीक्षक बाबासाहेब उतम नागरगोजे,भगवा नाना सांगळे, जयदीप कंन्ट्रक्शन कंपनीचे संचालक परिवंत गायकवाड,हनुमान गायकवाड, सोमीनाथ विधाते, योगिनाथ बांगर, महेश सांगळे,गणेश टकले,जायभाय सर, संजय गायकवाड, श्रीधर खांडवे, उध्दव खांडवे,बंडुशेठ बांगर,पत्रकार अक्षय विधाते,किरण गायकवाड, सलवार शेख,प्रशांत बांगर, अमर शेख, हरी टकले,अशोक नागरगोजे,निलेश गायकवाड,शरद खांडवे,कुमार गायकवाड,शहादेव गायकवाड,बाळू गायकवाड,किसन गायकवाड, किरण बांगर आप्पा बांगर, सागर खांडवे, जालीधर खांडवे आदि ग्रामस्थ उपस्थित होते.

## मातंग समाजाच्या विविध मागण्यांचे पंकजाताई मुंडे यांना लहुजी साळवे बहुजन क्रांती सेनेच्या वतीने निवेदन

तलवाडा प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्यामध्ये अनुसूचित जातींमध्ये लोकसंख्येने दुसऱ्या क्रमांकावर असणारा मातंग समाज आज शैक्षणिक सामाजिक आर्थिक राजकीय व सांस्कृतिक दृष्ट्या खूप पाठीमागे राहिला आहे या मातंग समाजाला शैक्षणिक सामाजिक आर्थिक राजकीय व सांस्कृतिक दृष्ट्या सक्षम करण्यासाठी अनुसूचित जातीतील आरक्षणाचे अ ब क ड आरक्षण वर्गीकरण केले पाहिजे साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांनी या देशातील दबलेल्या पिचलेल्या कष्टकरी शेतकरी श्रमिकांचे दुःख आपल्या साहित्यातून जगाच्या वेशीवर टांगले आणि अशी विपुल साहित्य संपादना निर्माण केली त्या लोकशाहीर साहित्य सम्राट अण्णाभाऊ साठे यांना मरणोत्तर भारतरत्न पुरस्कार देऊन सन्मानित केले पाहिजे व मातंग



समाज व मातंग समाजातील तत्सम जातींच्या युवकांना उद्योग व्यवसायासाठी साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे आर्थिक विकास महामंडळाची निर्मिती केली पण निधी अभावी मातंग समाजातील व मातंग समाजातील तस्समजातींच्या युवकांना उद्योग व्यवसायासाठी अर्थसहाय्य मिळत नसल्याने मातंग समाजातील तरुण हा सुशिक्षित बेरोजगारीकडे वळला आहे तरी मा.पंकजाताई मुंडे. पशुसंवर्धन व पर्यावरण आणि हवामान बदल कॅबिनेट मंत्री यांना निवेदनाद्वारे लहुजी साळवे बहुजन क्रांती सेनेच्या वतीने विनंती करण्यात येते की आपण वरील मातंग समाजाच्या हिताचे प्रश्न मार्गी लावून मातंग समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न कराल आणि मातंग समाजाला न्याय द्याल ही अपेक्षा लहुजी साळवे बहुजन क्रांती सेनेच्या वतीने निवेदनाद्वारे व्यक्त करण्यात आली.

## ना.पंकजाताई मुंडेंच्या हस्ते सुनिल मुंडे आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित

वडवणी। प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील चिंचवण केंद्राचे कार्यतत्पर केंद्रप्रमुख तथा कर्तव्यदक्ष केंद्रिय मुख्याध्यापक सुनिल मुंडे सर यांना नुकताच बीड जिल्हा पत्रकार संघ महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने जाहीर झालेला आदर्श शिक्षक पुरस्कार २०२५ हा पुरस्कार महाराष्ट्राच्या कॅबिनेट मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांच्या शुभहस्ते व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत बीड येथील पुरस्कार वितरण सोहळ्यात प्रदान करुन सन्मानित करण्यात आले. यावेळी वडवणी तालुक्यातील शिक्षकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.



शिक्षण हे केवळ ज्ञान देणे नाही, तर समाज घडवण्याचे एक महान कार्य आहे. या कार्यात अपार निष्ठा, सातत्यपूर्ण प्रयत्न आणि विद्यार्थ्यांप्रती आत्मीयता असलेल्या शिक्षकांचीच खरी ओळख आदर्श शिक्षक म्हणून केली जाते. अशाच एका प्रेरणादायी व्यक्तिमत्त्वाचा गौरव बीड जिल्हा पत्रकार संघ महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने करण्यात आला आहे. वडवणी तालुक्यातील चिंचवण केंद्राचे कार्यतत्पर केंद्रप्रमुख तथा कर्तव्यदक्ष केंद्रिय मुख्याध्यापक सुनिल फुलचंदराव मुंडे सर यांची आदर्श शिक्षक पुरस्कार २०२५ साठी गौरवशाली निवड करण्यात आली होती. शिक्षण क्षेत्रातील त्यांच्या उल्लेखनीय कार्य, विद्यार्थ्यांमध्ये निर्माण केलेले नवनविन शैक्षणिक दृष्टीकोन व मूल्याधिष्ठीत कार्यपध्दतीची प्रचिती म्हणून त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. हा सन्मान महाराष्ट्र राज्याच्या पर्यावरण, वातावरणातील बदल व पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांच्या शुभहस्ते बीड याठिकाणी बीड जिल्हा पत्रकार संघ महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने आयोजित एका भव्य आणि उत्साहवर्धक सोहळ्यात प्रदान करण्यात आला. सकारात्मक शैक्षणिक वातावरण निर्मिती हे त्यांच्या कार्याचे वैशिष्ट्य राहिले आहे. केंद्रप्रमुख या जबाबदारी सोबतच त्यांनी एक आदर्श केंद्रिय मुख्याध्यापक म्हणूनही आपल्या कार्याची वेगळी छाप सोडली आहे. त्यांच्या कार्यास मिळालेला हा सन्मान संपूर्ण वडवणी तालुक्यासाठी अभिमानास्पद बाब असून या पुरस्कारानंतर शिक्षण क्षेत्रासह सर्वच स्तरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## ईगलवूड समुहाच्या वतीने दांडीया नाईटचे आयोजन

माजलगाव । प्रतिनिधी

सोमवार दि.२२ सप्टेंबर रोजी घटस्थापना म्हणजेच शारदीय नवरात्रौत्सवचा प्रारंभ या निमित्त महिला शक्ति चा जागर व्हावा या उद्देशाने सलग तीन दिवस मंगळवार, बुधवार,गुरुवार दि.२३,२४,२५ सप्टेंबर रोजी सायंकाळी ०६:०० ते ०९:०० वाजेपर्यंत भव्य दांडीया नाईट चे आयोजन केले असून माजलगाव येथील महिला व मुलींनसाठी आकर्षक भेटवस्तू जिंकण्याची संधी केवळ महिलांसाठी नारी शक्तिचा जागर व्हावा या उद्देशाने या भव्य दांडीया नाईट कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

यावर्षी नवरात्रोत्सवात माजलगाव येथील सर्व महिला



भगिनींन साठी भव्य दांडीया नाईट चे आयोजन ईगलवूड इंग्लिश स्कूल, ईगलवूड पॉलिटेक्निक अँन्ड इंजीनियरिंग कॉलेज आणि ईगलवूड लिटल चॅम्प्स घ्या वतीने करण्यात आलेले आहे. या कार्यक्रमांमध्ये माजलगाव शहरातील सर्व माता-भगिनी - युवतींनी सहभागी व्हावे असे आवाहन डॉ.अर्चना पवार यांनी केले आहे.

## पाटोदा पंचायत समितीमध्ये उमेद अभियानाची आढावा बैठक

बीड । प्रतिनिधी

दिनांक २० सप्टेंबर रोजी पाटोदा पंचायत समिती येथे महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाची (उमेद) घटकनिहाय आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान आणि जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा (ऊठऊ-) च्या प्रकल्प संचालक श्रीमती संगीता देवी पाटील होत्या.

या बैठकीत प्रामुख्याने वैयक्तिक कर्ज प्रस्तावांना येणाऱ्या अडचणींवर सखोल चर्चा करण्यात आली. झचएत्रझ, उचएत्रझ आणि मुद्रा यांसारख्या योजनांमधून कर्ज मिळवण्यात येत असलेल्या समस्यांबाबत संबंधित बँक



व्यवस्थापकांशी थेट संवाद साधून उपाययोजनांवर विचारविनिमय करण्यात आला.

मुख्य कार्यकारी अधिकारी रहमान यांनी यावेळी गट विकास अधिकारी यांना मनरेगा (चऋछठएऋ-) योजनेतून शेळीपालन शेडसाठी तातडीने मंजुरी देण्याविषयी सूचना दिल्या. तसेच, तालुका उमेद टीमला वैयक्तिक कर्ज प्रस्ताव लवकरात लवकर निकाली काढण्याचे आदेश दिले.

श्रीमती पाटील यांनी स्मार्ट (डच-ठढ) अंतर्गत महिला शेतकरी उत्पादक कंपनीचे भागभांडवल वाढवण्यावर भर देण्यास सांगितले. याशिवाय, बैठकीत उपस्थित असलेल्या सर्व सीआरपी (कम्युनिटी रिसोर्स पर्सन) ताईंशी संवाद साधून त्यांच्या गावांमध्ये सुरू असलेल्या कामांविषयी आणि त्यांना येत असलेल्या अडचणींविषयी जाणून घेतले.

## ई -पीक पाहणी नोंदणीला ३० सप्टेंबर पर्यंत मुदतवाढ

बीड । प्रतिनिधी

खरीप हंगामा मधील शेतकरी स्तरावरील पिक पाहणी नोंदणीची मुदत ३० सप्टेंबर पर्यंत वाढवण्यात आली असल्याची माहिती निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी दिली.

प्रसिद्धीला दिलेल्या पत्रकात स्वामी यांनी म्हटले आहे की, सद्यस्थितीत राज्यात एकूण १.६९ कोटी हेक्टर पैकी ८१.०४ लाख हेक्टर म्हणजेच ४७.८९% क्षेत्रामध्ये पिकाची नोंदणी झाली आहे. दिनांक १४ सप्टेंबर पर्यंत ६० टक्के नोंदणी अपेक्षित होती. मात्र हे प्रमाण कमी झाले. त्यासाठी ३० सप्टेंबरपर्यंत मुदत वाढ देण्यात आली आहे. यासाठी नियुक्त केलेल्या पीक पाणी सहाय्यका मार्फत ही पूर्ण करून घ्यावी. पीक पाहणी कार्यक्रमाचा आढावा घ्यावा. गावातील शंभर टक्के पीक पाहणी सहाय्यका मार्फत पूर्ण करून घेण्याची जबाबदारी उपविभागीय अधिकारी व तहसीलदार यांच्यावर देण्यात आली आहे. पाच गुंठ्यापेक्षा कमी क्षेत्र असलेल्या किंवा बिगर शेती व लागवडीखाली नसलेल्या क्षेत्राची तपासणी करून ती ओनर्स च्या प्लॉटमधुन वगळावी व यापूर्वी कळवण्यात आल्यानुसार अहवाल या कार्यालयात सादर करावा. कायम पडीक जमिनीची नोंदणी करून ती पिक पाहणी क्षेत्रातून वगळण्याची कार्यवाही तात्काळ करण्यात यावी. याबाबत उपविभागीय अधिकारी आणि तहसीलदारांनी नियोजन करून तात्काळ कारवाई करावी. याचा वारंवार आढावा घ्यावा अशा सूचना निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी दिल्या आहेत.

## भूमिपुत्रांच्या कौतुकाच्या वर्षावाने पोलीस अधिकारी बजरंग बनसोडे गहिवरले

आष्टी । प्रतिनिधी

पोलीस विभागामध्ये कार्यरत असताना राष्ट्रीय पातळीवर प्रतिनियुक्तीवर असताना अत्यंत मौलिक कामगिरी केल्याबद्दल २०२४ मध्ये भारत सरकारचे केंद्रिय गृहमंत्री दक्षता पदक व २०२५ मध्ये राष्ट्रीय तपास यंत्रणा पोलीस महासंचालकांच्या रौप्यपदक प्रदान करून अनेक प्रशस्ती पत्रास पात्र ठरलेल्या आपल्या मित्राच्या अभिनंदनसाठी गेलेल्या आष्टी येथील पत्रकार बांधवांनाच्या शुभेच्छा वर्षावाने उच्चपदस्थ पोलीस अधिकारी अक्षरशः गहिवरून गेले!

त्याचे झाले असे की,मुंबई येथे पोलीस उपायुक्तपदी नियुक्तीवर असलेले आष्टी तालुक्यातील रुईनालकोलचे भूमिपुत्र बजरंग आनंदराव बनसोडे यांना नुकताच



राष्ट्रीय तपास यंत्रणा महासंचालक यांच्याकडून विशेष कामगिरी बद्दल रौप्य पदक जाहीर करण्यात आले आहे.ही बाब अष्टीकरांना विशेष अभिमानास्पद आणि आनंदाची झाली... आणि म्हणून आष्टी येथील त्यांचा वर्गमित्र रघुनाथ कर्डीले हे ११ पत्रकारांसह पोलीस उपायुक्त बजरंग बनसोडे यांच्या मुंबईतील कार्यालयात जाऊन उत्स्फूर्तपणे त्यांचे कौतुक,अभिनंदन करुन शुभेच्छा दिल्या.गावाकडच्या बालपणीच्या मित्र परिवारा कडून झालेले हे कौतुक अनुभवताना पोलीस विभागातील उच्च पदावर असलेल्या पोलीस उपायुक्त बजरंग बनसोडे यांना भावना अनावर झाल्या. अक्षरशः गहिवरून व आनंदुन त्यांनी या अत्यंत प्रेमाच्या शुभेच्छा स्वीकारल्या.... आणि एक तास गप्पांमध्ये मैफिल रंगली...

राष्ट्रीय तपास यंत्रणा नवी दिल्ली येथे कार्यरत असताना राष्ट्रीय सुरक्षा व ऐक्य अबाधित राखण्यासाठी केलेल्या विशेष कामगिरीबद्दल

भारत सरकार गृह विभागाने केंद्रीय गृहमंत्री दक्षता पथक २०२४ हा पुरस्कार देऊन त्यांचा गौरव केला आहे.देशसेवा देशहिताला सर्वप्रथम प्राधान्य देणारी बजरंग बनसोडे यांची वृत्ती आहे.त्यांना कठीण काम सहज पूर्ण करण्यास मदत करते.याप्रसंगी तालुक्यातील महापूर,पिकांची हानी,नागरिकांचे हाल,पर्यावरण संरक्षण,पर्यावरण संरक्षण,नदी संरक्षण,संवर्धन या विषयावर त्यांनी उपयुक्त चर्चा केली.पर्यावरणाची जोपासना व पंचमहाभूतांचे महत्त्व ओळखून त्यांना जपणे आणि संवर्धन करणे हे मानवी कल्याणासाठी खूप आवश्यक आहे असेही यावेळी बनसोडे यांनी सांगितले.

## सेवा पंधरवडा मोहीम गांधी जयंती पर्यंत चालणार

बीड । प्रतिनिधी

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या जन्मदिनापासून ते राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंती दिनापर्यंत छत्रपती शिवाजी महाराज अभियाना अंतर्गत सेवा पंधरवाडा साजरा करण्यात येत आहे. या संदर्भात आतापर्यंत २३ बैठका घेण्यात आल्या असून याचा शुभारंभ पालकमंत्री अजित पवार यांच्या हस्ते करण्यात आला आहे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यासाठी उपविभागीय अधिकारी, तहसीलदार यांना सूचना आणि मार्गदर्शन करण्यात आले आहे.

यासाठी जिल्हास्तरावर एक प्रशिक्षण आणि तहसील कार्यालय स्तरावर २२ प्रशिक्षण असे २३ प्रशिक्षण सत्र घेण्यात आले. सेवा पंधरवाडाच्या अनुषंगाने सस्ती अदालत, शिवरस्ते, पानंद रस्ते, जिवंत सातबारा ,विविध सेवा व प्रमाणपत्र वाटपा करिता १४०२ गावांमध्ये मिळावे घेण्यात आले. पाणंद रस्ते विषयक अभियान दिनांक १७ ते २२ सप्टेंबर दरम्यान राबविण्यात येणार आहे, सर्वांसाठी घरे ही मोहीम २३ सप्टेंबर ते २७ सप्टेंबर या कालावधीत राबवण्यात येणार आहे. तर जिल्ह्यातील ८६ मंडळांमध्ये २८ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर दरम्यान जनता दरबाराचे आयोजन करण्यात आल्याची माहिती निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी प्रसिद्धी पत्रकात दिली.

cmyk

# साताऱ्याच्या कुसुंबीची नाचणी सातासमुद्रापार, ७०० हेक्टरवर लागवड, ४०० महिला कमवतात लाखो रुपये

सातारा जिल्ह्यातील जावळी तालुक्यातील कुसुंबी हे गाव 'नाचणीचे गाव' म्हणून राज्यासह देशभरात ओळखले जाऊ लागले असून या गावच्या नाचणीचे खमंग पदार्थ सातासमुद्रापार गेले आहेत. या गावात यंदा नाचणीची विक्रमी लागवड झाली असून ७०० हेक्टरवर या पिकाची लागवड करण्यात आली आहे. त्यात आता नाचणीच्या विक्रमी लागवडीमुळे कुसुंबीला नाचणीचे गाव म्हणून वेगळी ओळख निर्माण झाली आहे. साताऱ्याच्या कुसुंबीच्या नाचणीचा खमंग स्वाद सातासमुद्रापार आहे. तब्बल ४०० महिला नाचणीची शेती करत आहेत. या गावाने नाचणीचे गाव म्हणून देशभरात नवी ओळख निर्माण केली आहे. ७०० हेक्टरवर लागवड केली असून, या सर्व महिला नाचणीच्या शेतीतून लाखो रुपये मिळवत आहेत. नाचणीच्या माध्यमातून १५ प्रकारचे विविध खाद्य पदार्थांचे प्रॉडक्ट निर्मिती केली जाते. हे पदार्थ राज्यसह देशभरात विक्रीसाठी कुसुंबीकर पाठवतात.

दरवर्षी दिवाळीला देखील दिवाळी फराळ अमेरिकेला पाठवला जातो. नाचणीचे पौष्टिक लाडू, शेवया, चिवडा, भडंग, कुकीज, मिठाई, केक मागणीप्रमाणे बनवून दिले जात आहेत. नाचणीसारख्या पोषक अन्नधान्याची वाढती मागणीमुळं कुसुंबी गावातील २३२ महिला या



स्वावलंबी झाल्या आहेत. या महिलांनी थेट गावामध्ये खाद्यपदार्थ तयार करण्याची कंपनी सुरू केली आहे. या कंपनीच्या माध्यमातून दरवर्षी लाखो रुपयांचा नफा त्या कमवत आहेत. मानवी आहारात वापरल्या जाणाऱ्या तृणधान्य पिकामध्ये भात व गहू या प्रमुख धान्याचा समावेश होतो. इतर भरड धान्य पिकांमध्ये ज्वारी, बाजरी, नाचणी, राळा, कोडो, कुटकी, बरटी व वरई या पिकांचा समावेश होतो. राज्यात ज्वारी, बाजरी, नाचणी आणि वरई या पिकांची लागवड केली जाते. साधारणपणे २० व्या शतकाच्या पूर्वार्धात आणि पारंपरिक दृष्ट्या या पिकांची लागवड आणि उत्पादन आपल्या देशात घेतले जात होते आणि आपल्या दैनंदिन आहार पद्धतीत या धान्याचा वापर मोठ्या प्रमाणात होत होता.

नाचणी हे गवतवर्गीय कुळातील महत्वाचे पीक आहे. त्यामुळे या पिकाची वाढ होताना मुख्य खोडासोबत फुटवे येण्याचा गुणधर्म आहे. या धान्याचा आकार लहान असून आकार हे एकदलवर्गीय पीक आहे. या पिकामध्ये स्वपरागीभवन प्रक्रियेदवारे बीज निर्मिती होते. सर्वच भरड धान्य पीके ही बदलत्या हवामानास अनुकूल पिके आहेत. या पिकांमध्ये सी४ पद्धतीने प्रकाश संश्लेषण (मका, ऊस, ज्वारी) होते. त्यामुळे पानाद्वारे अन्ननिर्मिती करताना प्रकाश, पाणी व कार्बन डायऑक्साइडचा सुयोग्य वापर या वनस्पतीमध्ये केला जातो.

तसेच प्रतिकूल परिस्थितीत वाढीची उत्कृष्ठ वैशिष्ट्ये जसे की, कमी ऊंची, पानांचा लहान आकार, कणिस व पाने यामध्ये अन्नपदार्थ पुरविण्यासाठी योग्य पद्धत, तंतूमय मुळांची खोल वाढ व प्रतिकूल परिस्थितीत तग धरण्याचा गुणधर्म यामुळे या पिकांचे शेतकऱ्यांच्या दृष्टीने अनन्यसाधारण महत्व आहे.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१४९९ : बेसलचा तह स्वित्झर्लंड स्वतंत्र राष्ट्र बनले.
१६६० : शिवाजी महाराजांच्या आज्ञेवरुन पन्हाळगड सिद्दी जौहरच्या ताब्यात देण्यात आला.
१८८८ : 'द नॅशनल जिऑग्रॉफिक' या मासिकाचा पहिला अंक प्रकाशित झाला.
१९३१ : नेपाळ–राजपुत्र हेमसमशेर जंगबहादुर राणा यांनी स्वातंत्र्यवीर सावरकर यांची भेट घेतली.
१९६५ : दुसरे काश्मीर युद्ध संयुक्त राष्ट्रसंघाच्या युद्धबंदी आदेशानंतर भारत पाकिस्तान मधील दुसरे काश्मीर युद्ध थांबले.
१९८० : इराकने इराण पादाक्रांत केले.
१९८२ : कलावैभव निर्मित, जयवंत दळवी लिखित व रघुवीर तळाशिलकर दिग्दर्शित 'पुरुष' या नाटकाचा पहिला प्रयोग दादर येथील शिवाजी मंदिर येथे झाला.
१९९५ : श्रीलंकेच्या हवाई दलाने नागरकोवेल येथे एका शाळेवर केलेल्या बॉम्बहल्ल्यात कमीतकमी ३४ जण ठार झाले. यातील बहुसंख्य तामिळ विद्यार्थी होते.
१९९५ : घरात अथवा कार्यालयात राष्ट्रध्वज फडकाविण्याचा अधिकार सर्वसामान्य नागरिकास असल्याचा दिल्ली उच्च न्यायालयाचा निर्णय
१९९८ : क्रिकेटपटू सुनील गावसकर यांना 'महाराष्ट्र भूषण' हा महाराष्ट्र राज्याचा सर्वोच्च सन्मान जाहीर
२००३ : नासाच्या गॅलिलिओ या अंतराळ यानाने गुरूच्या वातावरणात प्रवेश करीत प्राणार्पण केले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७९१ : मायकेल फॅरेडे इंग्लिश भौतिकशास्त्रज्ञ (मृत्यू: २५ ऑगस्ट १८६७)
१८२९ : व्हिएतनामचा राजा टू डुक यांचा जन्म.
१८६९ : व्ही. एस. श्रीनिवासशास्त्री कायदेतज्ञ, सूक्ष्मबुद्धीचे राजकारणी, भारत सेवक समाजाचे अध्यक्ष आणि इंग्रजी वक्ते (मृत्यू: १७ एप्रिल १९४६)
१८७६ : फ्रांसचे पंतप्रधान आंद्रे तार्द्यू यांचा जन्म.
१८७८ : जपानचे पंतप्रधान योशिदा शिगेरू यांचा जन्म.
१८८५ : ऑस्ट्रेलियाचे पंतप्रधान बेन चीफली यांचा जन्म.
१८८७ : कर्मवीर भाऊराव पाटील शिक्षणतज्ञ, बहुजनसमाजातील तळमळीचे कार्यकर्ते, रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक, पद्मभूषण (मृत्यू: ९ मे १९५९)
१९०९ : दत्तात्रय तुकाराम तथा 'दत्तू' बांदेकर ऊर्फ 'सख्याहरी' विनोदी लेखक, विडंबनकार व स्तंभलेखक (मृत्यू: ३ आक्टोबर १९५९)
१९१५ : अनंत माने पाच तपांहुन अधिक काळ चित्रपटसृष्टीसाठी व्यतीत करणारे व मराठी चित्रपटसृष्टीवर आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवणारे दिग्दर्शक. 'पिंजरा', 'लक्ष्मी', 'सुशीला', 'आई' हे त्यांचे गाजलेले चित्रपट आहेत. 'अनंत आठवणी' हे त्यांचे आत्मचरित्र प्रसिद्ध आहे. (मृत्यू: ९ मे १९९५)
१९२२ : नोबेल पारितोषिक विजेते चिनी भौतिकशास्त्रज्ञ चेन निंग यांग यांचा जन्म.
१९२३ : ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक व उद्योगपती रामकृष्ण बजाज यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१५३९ : गुरू नानक देव शिख धर्माचे संस्थापक आणि पहिले गुरू (जन्म: १५ एप्रिल १४६९)
१९५२ : फिनलंड देशाचे पहिले अध्यक्ष कार्लो जुहो स्टॅहल्बर्ग यांचे निधन. (जन्म: २८ जानेवारी १८६५) रसायनशास्त्रज (जन्म: २ सप्टेंबर १८७७)
१९५६ : नोबेल पारितोषिक विजेते इंग्लिश रसायनशास्त्रज फ्रेडरिक सॉडी यांचे निधन. (जन्म: २ सप्टेंबर १८७७)
१९७० : शरदेंन्दू बंदोपाध्याय बंगाली लेखक (जन्म: ३० मार्च १८९९)
१९९१ : दुर्गा खोटे हिन्दी व मराठी चित्रपटातील अभिनेत्री. सुमारे ५० वर्षांच्या कारकिर्दीत त्यांनी ३०० हून अधिक चित्रपटांत भूमिका केला. १९८२ मध्ये 'मी दुर्गा खोटे' हे त्यांचे आत्मचरित्र प्रसिद्ध झाले. (जन्म: १४ जानेवारी १९०५)
१९९४ : जी. एन. जोशी भावगीतगायक व संगीतकार. एच. एम. व्ही. या कंपनीत काम करत असताना त्यांनी अनेक नवीन गायकांना संधी देऊन त्यांच्या ध्वनिमुद्रिका काढल्या. (जन्म: ६ एप्रिल १९०९)
२०११ : मन्सूर अली खान पतौडी भारतीय क्रिकेट कप्तान आणि पतौडी संस्थानचे ९ वे व शेवटचे नबाब (जन्म: ५ जानेवारी १९४१)

# कपाशीच्या पाते, फुल आणि बोंड लागण्याच्या कालावधीमध्ये घ्या काळजी



सध्या महाराष्ट्र मध्ये पावसाने खंड दिलेला आहे. त्यामुळे कपाशी सोबतच इतर पिकांना देखील पाण्याची दुर्भिक्ष जाणवत आहे. त्यामुळे खरीप पिकांच्या उत्पादनाला याचा फटका बसण्याची शक्यता आहे. परंतु अशाही परिस्थितीमध्ये जर आपण कापूस या पिकाचा विचार केला तर हा कालावधी कापूस पिकासाठी खूप महत्त्वाचा असून व्यवस्थापनाच्या दृष्टिकोनातून देखील या कालावधीचे महत्त्व खूप अनन्यसाधारण असे आहे.

साधारणपणे हा कालावधी कापूस पिकाला पाते, बोंड लागण्याचा कालावधी असून यावरच कपाशीचे पुढील उत्पादन अवलंबून असते. त्यामुळे हवामानातील बदल किंवा एखाद्या वेळेस जास्त पाऊस पडून गेल्यानंतर उद्भवणारी स्थिती किंवा पाण्याचा ताण पडल्यानंतर कापूस पिकावरील पाते आणि बोंडगळीची समस्या निर्माण होते. ही समस्या जर जास्त प्रमाणात उद्भवली तर नक्कीच उत्पादनावर त्याचा विपरीत परिणाम होतो. यामध्ये सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे जेव्हा कपाशीला अगदी सुरुवातीच्या काळामध्ये जे फुल येतात त्यांचे रूपांतर पाते आणि बोंडामध्ये होत असते. परंतु गेल्या काही वर्षापासून आपण बघत आहोत की याच कालावधीमध्ये नेमके पाने लाल पडण्याची विकृती म्हणजेच आपण त्याला लाल्या रोग म्हणतो याचा अटॅक कपाशीवर होताना दिसून येतो. याच्या नियंत्रणाकरिता आपल्याला मुख्य अन्नद्रव्य देणे गरजेचे आहेच परंतु त्यासोबतच इतर सूक्ष्म अन्नद्रव्यांची फवारणी देखील आवश्यक आहे. कपाशीवर लाल्या रोग येऊ नये याकरिता मॅग्नेशियम सल्फेट एक टक्के म्हणजेच दहा ग्रॅम आणि त्यासोबत युरिया एक टक्के म्हणजेच दहा ग्रॅम प्रति लिटर पाणी याप्रमाणे फवारणी करावी. ही फवारणी करताना कुठल्याही प्रकारचा कीडनाशकाचा यामध्ये समावेश करू नये. दुसरे महत्त्वाचे म्हणजे पीक जेव्हा फुलोरा अवस्थेमध्ये असते तेव्हा दोन टक्के युरिया किंवा दोन टक्के डीएपी म्हणजेच वीस ग्रॅम प्रति लिटर पाणी किंवा १९:१९:१९ पाच ग्रॅम प्रति लिटर पाणी प्रमाणे या अन्नद्रव्यांचे लागवडीच्या ४५ व ६५ व्या दिवशी फवारणी करावी. तसेच फुलोरा अवस्थेमध्ये पीक असेल तर ००:५२:३४ चार ग्रॅम प्रति लिटर पाणी याप्रमाणे फवारणी करावी. फुलोरा अवस्थे नंतर पाते व बोंडे तयार होतात व ही अवस्था खूप महत्त्वाची असते.

# बाजारातून दुधाळ जनावरांची खरेदी करताना या बाबी तपासा

शेतकरी असण्याबरोबरच तुम्ही उत्तम पशुपालक होण्याचा विचार करीत असाल तर तुम्ही आधी उत्तम जनावरांची निवड केली पाहिजे. बाजारातून जनावरे विकत घेत असताना अनेक महत्वाच्या गोष्टी विचारात घ्याव्या लागतात. उपलब्ध परिस्थितीत दुधाळ जनावराची कोणती जात नफा देऊ शकेल अशी जात निवडावी. जर फक्त दूध उत्पादन हाय पशुपालकाचे हेतू असेल तर म्हैस पालन करणे कधीही उत्तम ठरते.

दुधाळ जनावरांची निवड कशी करावी?

जनावराचा पाठीचा कणा वाकलेला असू नये. जनावरांची पहिली बरगडी दिसते स्वाभाविक असले तरी तिसरा बरगडी पर्यंत दिसणारी जनावरे अशक्त या प्रकारात मोडतात. गाईच्या पोटाचा तसेच छातीचा भाग लांब, खोल आणि रुंद असावा. उत्तम खाद्य पचवण्याची क्षमता असलेल्या जनावरांची निवड करावी. कास आणि सडाची तपासणी करावी. कासेची खोली मापक व क्षमता पुरेशी असावी. सड काशेच्या प्रत्येक चतुर्थांश प्रमाणबद्ध असावी. काटकोनात स्थित असावेत. मागील कास रुंद, उंच व घट्टपणे शरीराशी शी संलग्न असावी. किंचित वर्तुळाकार पद्धतीने मुळास जोडलेली असावी. कासेचे विभाजन पुरेशा प्रमाणात संतुलित असावे. पुढची कास घट्टपणे संलग्न असून त्याची लांबी मध्यम आणि क्षमता पुरेशी असावी. सड दंडगोलाकार, एकसमान आकाराचे व मध्यम लांबी आणि व्यास असावा. कासेस चार व्यतिरिक्त अधिक सड असू नये. सडातून हृदयाकडे जाणारी रक्तवाहिनी प्रशस्त व फुगीर असावे. जनावरांच्या दाताचे पाहणी करून वयाची खात्री करता येते. या वयातील जनावरे चार



दाती असतात.

जनावरांमध्ये गर्भपाताच्या घटनेचे प्रमाण तसेच कासदाह आजाराचा प्रादुर्भाव कधी झाला होता का याची माहिती घ्यावी. चारही सड पिळून पाणी उत्तम यामुळे सडनलिका बंद नाही याची खात्री होते.

जनावरे आजारी असल्याची लक्षणे : अनेक आजारांचे जनावरांच्या बाह्य लक्षणांवरून निदान केले जाऊ शकते जसे की डोळ्यांतून आठवा नाकातून स्राव येणे हे जनावर आजारी असल्याचे लक्षण आहे. तसेच योनी मार्ग अथवा गुद्द्वारातून रक्त किंवा अस्वाभाविक स्राव येणे योनीचे आजाराचे लक्षण आहे. आजारी जनावर सुस्त, मलुल व अशक्त झालेले असते. काही आजारात बाह्य लक्षणे दिसून येत नाहीत. आजारापासून वाचण्यासाठी जनावरांची नियमित लसीकरण केले जाते का याची चौकशी करावी व तसेच पशु वैद्यकीय प्रमाणपत्र दाखवण्याचा आग्रह करावा.

गायींची निवड : आपल्याकडे होल्स्टिन संक्रीत आणि जर्सी संकरित गाई दिसतात. होल्स्टिन गायीचे दुधाचे प्रमाण अधिक आहे. तर जर्सी संकरित गाईच्या दुधात स्निग्धांश अधिक असते. गरजेप्रमाणे जर्सी किंवा होल्स्टिन गाईची निवड करावी. संकरित गाई घेताना पाणी आणि चाऱ्याची उपलब्धता लक्षात घेता विदेशी रक्ताचे प्रमाण ६२.५० टक्क्यांपेक्षा अधिक असू नये. जर्सी संकरित गाई डोंगराळ भागात संगोपनासाठी चांगले आहेत तर होल्स्टिन संकरित गाईंचे संगोपन पठारी भागात करावे.

# जनावरांच्या आहारात खनिजमिश्रणांचे महत्व

खनिजद्रव्यांचे थोडक्यात महत्व काय असते याची माहिती आजच्या लेखात करून घेऊयात. खनिजमिश्रणे हि नवजात वासराच्या वाढीसाठी अत्यंत महत्वाची असतात. जनावरांच्या हाडांना बळकटी देण्याचे कार्य खनिज मिश्रणांमार्फत केले जाते. पचनासाठी व प्रतिकारशक्ती वाढविण्यासाठी खनिजद्रव्ये महत्वाचे कार्य करत असतात. खनिजमिश्रणे गर्भाशयातील वासराच्या वाढीसाठी अत्यंत महत्वपूर्ण असतात. खनिजद्रव्ये उदा. कॅल्शिअम व फॉस्फोरस हाडांच्या निर्माणासाठी व त्यांच्या मजबुतीसाठी कार्य करत असतात. खनिजद्रव्यांच्या आहारातील समावेशामुळे प्रजनन शक्तीस बळकटी मिळून दोन वेतांमधील अंतर कमी केले जाऊ शकते.

खनिजमिश्रणांच्या नियमित सेवनाने जनावराच्या गाभण न राहणे अथवा जनावर वारंवार उलटणे..इ. समस्यांवर मात करता येते. जनावरांच्या वेतानंतर येणारा शारीरिक ताण भरून काढण्यासाठी खनिजमिश्रणे महत्वाची भूमिका बजावत असतात. खनिजमिश्रणे जनावरांच्या दुग्धोदपादनात महत्वाचे कार्य करत असतात. शारीरिक जखमा व झीज भरून काढण्यासाठी. जनावरांना दीर्घ काळापर्यंत उत्पादनक्षम बनवून ठेवण्यासाठी.

खनिजमिश्रणांच्या कमतरतेमुळे होणारे आजार: रोगप्रतिकारक क्षमता कमी होणे. जनावर वेळेवर



माजावर न येणे. गाभण राहण्यासंदर्भातील अडचणी उद्भवणे. जनावरांच्या कार्यक्षमतेत किंवा उत्पादनात घट येणे. पचनक्रियेसंबंधित अडचणी उद्भवणे. न्यूमोनिया सारख्या गंभीर रोगाची लागण होणे. जनावरांमधील वंध्यत्व किंवा वांझपणासंबंधी तक्रारी उद्भवणे. वयात येण्यासाठी होणार विलंब. जनावरांमधील रक्तक्षय. वर न पाडण्यासंदर्भातील अडचणी उद्भवणे. स्तनदाह (कासदाह). हाडांचे आजार. १३.गर्भपात. अशक्त किंवा मेलेले वासरू जन्माला येणे. अंडाशयासंबंधित विकार उद्भवणे. जनावरांमधील हगवण. गर्भाशयातील दाह किंवा जळजळ. जनावरांमधील गलगंडइ.लक्षणे व आजार खनिजमिश्रणांच्या कमतरतेमुळे दिसून येतात.

खनिजमिश्रणे व त्यांचे विशिष्ट कार्ये : कॅल्शिअम: दुग्धोत्पादन वाढीसाठी, हाडांच्या वाढीसाठी. आणि स्नायूंच्या कार्यासाठी. फॉस्फोरस : हाडांच्या वाढीसाठी व त्यांच्या देखभालीसाठी. दुग्धोत्पादन व स्नायूंच्या देखभालीसाठी. सेलेनियम : वार अडकणे, गर्भाशयाचा दाह, बीजांडकोशाच्या सुरळीत कार्यासाठी, सांधा निखळणे व रोगप्रतिकार क्षमता वाढविण्यासाठी. कोबाल्ट : प्रजननासंबंधित तक्रारी, जीवनसत्व निर्मिती (१२) प्रतिकारशक्ती, उत्पादनवाढीसाठी.

सोडियम : शरीरद्रव्यांच्या सामू नियंत्रणासाठी (उदा. रक्त, प्रोटोप्लासम..इ.), पाणी संतुलन व दुग्धोपादनासाठी. स्नायू व मज्जातंतूच्या कार्यासाठी. पोटॅशिअम : मज्जासंस्थेच्या कार्यासाठी, पाणी संतुलनासाठी इ. मँगनीज : गर्भाच्या वाढीसाठी, स्तनवृद्धीसाठी, दूध उत्पादन आणि दीर्घकाळ माजासाठी. कॉपर : हिमोग्लोबीन निर्मितीसाठी, प्रजनन, केराटिन संश्लेषणासाठी (केस व लोकर उत्पादनासाठी), पोटासंबंधित आजारासाठी. झिंक : प्रजनन, वासरांच्या वाढीसाठी, आणि पोटाच्या तक्रारीसाठी इ.

तर अश्या रीतीने जनावरांच्या आहारात वरील खनिजद्रव्यांचा समावेश केल्यास जनावरांचे विविध आजार व लक्षणांपासून संरक्षण केले जाऊ शकते.

# कोरडवाहू शेतीत चिंच लागवड ठरेल फायदेशीर

जर आपण चिंच लागवडीचा विचार केला तर हव्या त्या प्रमाणात चिंचेचे लागवड क्षेत्र नाही. परंतु कोरडवाहू शेतीसाठी चिंच लागवड एक वरदान ठरू शकते. चिंच लागवडीत जास्त काही व्यवस्थापनावर लक्ष केंद्रित करण्याची गरज नसून एक जमिनीची निवड आणि चिंचेच्या प्रमुख जाती इत्यादी गोष्टी माहित असणे आवश्यक आहे. चिंचेची लागवड पद्धत आणि खत व्यवस्थापन यावर विशेष लक्ष दिले तर चिंच लागवड एक वरदान ठरू शकते.

तुम्हाला जर चिंचेचे रोप किंवा कलम यांचे लागवड करायची असेल तर त्यासाठी एक बाय एक बाय एक मीटर आकाराचे खड्डे खोदून घ्यावेत.

ज्या वेळेस तुम्ही एकटे भराल त्यावेळी खड्ड्याच्या तळाशी दहा ते पंधरा सेंटीमीटर उंचीपर्यंत पालापाचोळा टाकावा व त्यानंतर चांगले कुजलेले शेणखत अंदाजे पंधरा किलो, नत्र, स्फुरद आणि पालाश या मुख्य अन्नद्रव्ये यांचे मिश्रण शंभर ग्रॅम आणि २०० ग्रॅम निंबोळी आणि माती यांचे मिश्रण करून खड्डे भरावेत. खड्डे भरताना मातीत १०० ग्रॅम कीडनाशक पावडर मिसळली तर फायद्याचे ठरते. एक दोन चांगले पाऊस पडल्यानंतर रोप किंवा कलमांची मुख्य शेतात लागवड करावी. त्यामुळे पावसाळी दमट हवामानाचा झाडाच्या वाढीसाठी भरपूर फायदा होतो. झाडाचे मर कमी होते व झाडाची वाढ जोमदार होते. उन्हाळ्यामध्ये आवश्यक ओलावा टिकून राहावा यासाठी हा यामध्ये वाळलेले गवत, पाचटाचे आच्छादन किंवा भुसा वगैरे यांचा वापर फायद्याचा ठरतो. चिंचेच्या झाडाची वाळवी किंवा मूळकूज इत्यादीपासून बचाव करण्यासाठी शिफारसीत बुरशीनाशक व कीटकनाशकांचे आळवणी प्रत्येक रोपाच्या आळ्यात करावी. चिंचेच्या झाडाला वळण देणे खूप महत्त्वाचे आहे.

राज्य लोकतंत्र
अहिल्यानगर–जालना
सोमवार दि.२२ सप्टेंबर २०२५
५

# मत्स्योदरी देवीच्या नवरात्राला आजपासून सुरुवात

## डीवायएसपी डॉ. धुमाळ यांनी केली मंदिर परिसराची पाहणी

अंबड । प्रतिनिधी

मराठवाड्यामध्ये जालना जिल्ह्याचे आराध्य दैवत असलेल्या श्री मत्स्योदरी देवीच्या नवरात्र उत्सवाची संस्थानच्यावतीने जय्यत तयारी करण्यात आली आहे. मंदिरासह परिसराची स्वच्छता तसेच रंगरंगोटी करण्यात आली असून जिल्ह्यातील प्रमुख मान्यवरांसह इतरांना नवरात्र उत्सवाच्या निमंत्रण पत्रिकाही देण्यात आल्या आहेत. तसेच उपविभागी पोलीस अधिकारी डॉ. सिद्धेश्वर धुमाळ येणे मंदिर परिसरातील पूर्ण पाहणे केल्या असून तसेच पोलीस ठाण्याचे पोलीस कर्मचाऱ्यांना कडे कोट पोलीस बंदोबस्त ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

नवरात्र उत्सवाला आज २२ सप्टेंबर रोजी संस्थान अध्यक्ष तथा तहसीलदार विजय चव्हाण व सौ. सोनाली चव्हाण यांच्या हस्ते घटस्थापनेने प्रारंभ होईल. त्यापूर्वी आवश्यक ती सर्व कामे मत्स्योदरी देवी संस्थानच्यावतीने हाती घेतलेली बहुतांशी कामे पूर्णत्वास गेली आहेत. संस्थानने नवरात्र उत्सवाचे चोख



नियोजन केले असून पावसाचा अंदाज पाहुन ६० बाय ६० अकराचा वॉटरप्रूफ मंडपही टाकण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे भाविकांच्या सुविधेसाठी आणखी १३ नविन शौचालयाचे बांधकाम करण्यात आले आहे तसेच मंदिर परिसराची साफसफाई, स्वच्छता करण्यात आली. सद्या मंदिरासह परिसरात रंगरंगोटी तसेच विद्युत रोषणाईचे काम पूर्ण झाले असून मंदिर परिसरात दुकानांच्या जागा निश्चितीसह नियोजन करून संबंधितांना दुकानांचे वाटप करण्यात आली . यावेळी बोलताना डीवायएसपी डॉ. सिध्देश्वर धुमाळ म्हणाले की पाकीटमार व टवाळखोरांवर सिसिटीव्ही कॅमेऱ्याप्रमाणे पोलिसांचीही सतत नजर असणार आहे. नवरात्र उल्लसव काळात दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना विशेषतः मुली, महिला भविकांना या दृष्टीने कुठलाही त्रास होणार नाही या दृष्टीने मंदिर व परिसरात चोख पोलिस बंदोबस्त राहणार असून पाकीटमार व टवाळखोर यांच्यावर सिसिटीव्ही कॅमेऱ्याप्रमाणे पोलिसांचीही सतत नजर असेल. भाविकांच्या सुरक्षेसाठी पोलीस तत्पर असून, यात्रा वावर्षीही सुरळीत व शांततेत संपत्र व्हावी यासाठी पोलिसांचा चोख बंदोबस्त राहील.

त्यामुळे भाविकांनी निर्धास्तपणे दर्शनाचातसेच नवरात्र उत्सवाचा आनंद घ्यावा. असे आवाहन डॉ. धुमाळ यांनी यावेळी केले. संस्थानच्यावतीने जायत तयारी करण्यात आली आहे. यावेळी पुजारी आणि विश्वरत गीत विलास कुंटेफळकर, संस्थानचे व्यवस्थापक कैलास शिंदे आणि संस्थान कर्मचारी उपस्थित होते.

# महाराज अग्रसेन जयंती निमित्त ज्येष्ठांचे पूजन, नववधूंचे स्वागत!

जालना । प्रतिनिधी

समाजवादाचे प्रनेते ,श्री महाराज अग्रसेन यांच्या जयंती महोत्सवानिमित्त अग्रवाल महिला मंडळाच्या वतीने महाराजा अग्रसेन फाउंडेशनच्या सभागृहात गुरूवारी ( ता. १८) सायंकाळी अग्रवाल समाजातील ८५ जेष्ठ नागरिकांचे चरण पूजन करून सन्मान करण्यात आला.तसेच २१ नवीन वधूंचे स्वागत, परिचय असा ''रिश्तो की डोर '' या आगळा-वेगळा उपक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

उद्योजक कमलबाबू झुनझुनवाला, सपना गोयल ,कमलकिशोर बगडिया यांची याप्रसंगी प्रमुख उपस्थिती होती. मंडळाच्या अध्यक्षा राधिका बगडिया यांनी यावेळी सांगितले की, ज्येष्ठांचे कर्तृत्व आणि अनुभव समाजातील युवक ,युवती आणि बालकांना माहीत व्हावे, नववधूंच्या परिचयातून नातेसंबंध अधिक दृढ होण्याच्या दृष्टीने सदर उपक्रम राबविण्यात आला. यात समाजातील लहान बालकांपासून युवक- युवती,जेष्ठांपर्यंत सर्व स्तरातील समाज बांधवांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला असे राधिका बगडिया यांनी नमूद केले. गायक दर्शित गादिया यांनी आपल्या सुमधुरवाणीतून महाराजा अग्रसेन यांचे जीवन



चरित्र, तसेच धार्मिक, कौटुंबिक गीते सादर करून उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. सूत्रसंचालन राजेश्वरी अग्रवाल आणि छाया अग्रवाल यांनी केले. यावेळी प्रकल्प प्रमुख सरोज सराफ, शोभा पित्ती, संगीता तंबाखूवाला, कोमल अग्रवाल, रीता भरतिया, मंडळाच्या सचिव सीमा पंच,संस्थापक अध्यक्षा पुष्पादेवी पित्ती, इंदू निमोदिया, ज्योती अग्रवाल, अनिता देविदान, भारती लोहिया, चंचल अग्रवाल,पूनम अग्रवाल, सावित्री मल्लावत, आशा बगड़िया, अरुणा बगड़िया, सुषमा अग्रवाल यांच्यासह समाज बांधवांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# धनगर समाजाचा अनुसूचित जमात प्रवर्गात समावेशासाठी काँग्रेसचा पाठींबा




जालना । प्रतिनिधी

धनगर समाज हा महाराष्ट्रातील ऐतिहासिक व पारंपरिक समाज असून शतकानुशतके पशुपालन, शेती व जनजीवनाशी जोडलेला आहे. समाजाच्या मागणीनुसार त्यांचा अनुसूचित जमात एसटी प्रवर्गात समावेश व्हावा, अशी मागणी दीर्घकाळापासून होत आहे.जालना येथे या मागणीसाठी श्री दिपक बो-हाडे यांनी दि. १७/०९/२०२५ पासुन आमरण उपोषण सुरू केलेले आहे, त्यांच्या या उपोषणाला जालना जिल्ह्याचे खासदार डॉ. कल्याण काळे व काँग्रेस पक्षाच्या वतीने पाठींबा देण्यात आला डॉ.कल्याण काळे हे अतिवृष्टीमुळे झालेल्या शेतक-यांचे नुकसान पाहणीसाठी सिल्लोड व सोयगाव तालुक्यात असल्यामुळे त्यांच्या वतीने श्री भाऊसाहेब बापू काळे,

श्री राजेंद्र राख उपाध्यक्ष प्रदेश काँग्रेस कमिटी महाराष्ट्र,श्री अतिक भाई खान काँग्रेस कमिटी शहराध्यक्ष जालना, श्री कृष्णा पा. पडुळ काँग्रेस कमिटी तालुकाध्यक्ष जालना, श्री लक्ष्मण मसलेकर काँग्रेस कमिटी तालुकाध्यक्ष बदनापूर, श्री निळकंठ वायाळ काँग्रेस कमिटी तालुकाध्यक्ष मंठा, श्री बाबासाहेब आकात काँग्रेस कमिटी तालुकाध्यक्ष परतुर, श्री गणेश कुलकर्णी काँग्रेस कमिटी शहराध्यक्ष परतुर, श्री कल्याण तारडे काँग्रेस कमिटी तालुकाध्यक्ष अंबड, जालना पं. स. चे मा. उपसभापती श्री सोपान तिरुखे, श्री ज्ञानदेव इंगोले, श्री राम सिरसाठ यांनी पाठींब्याचे पत्र दिले यावेळी बोलताना श्री भाऊसाहेब काळे म्हणाले की, शासनाने पहिल्याच मंत्रिमंडळ बैठकीत निर्णय घेऊन धनगर समाजाला प्रवर्गात आरक्षण देवु असे आश्वासन दिले होते त्याबाबत काय झाले? आजच्या काळात धनगर समाजाला शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक प्रगतीसाठी योग्य न्याय देणे ही काळाची गरज आहे. शासनाने ही मागणी मान्य करून लवकरात लवकर निर्णय घ्यावा, अशी सर्वपक्षीय, सामाजिक संस्थांकडून एकमुखी मागणी होत आहे. आम्ही धनगर समाजाच्या या न्याय्य मागणीस पूर्ण पाठींबा देत आहोत. शासनाने सकारात्मक पावले उचलून समाजाच्या भावनांचा आदर करावा असे आवाहन त्यांनी केले तसेच खासदार डॉ कल्याण काळे साहेब हे सदरील आंदोलनस्थळी भेटीसाठी सोमवारी येणार असल्याचे कळवले.

# जामखेड तालुक्याला जोरदार पावसाने झोडपले

## तालुक्यात सर्वदूर जोरदार पाऊस, सर्वच नद्यांना पुर, जवळा बंधाऱ्याचा भराव गेला वाहून

जामखेड। प्रतिनिधी

जामखेड तालुक्याला अतिवृष्टी झाल्याने तालुक्यात सर्व दूर जोरदार पाऊस झाल्याने सर्वच नद्यांना पूर आला आहे. तालुक्यातील जवळा बंधारा भराव पूर आल्याने वाहून गेला असल्याने शेतीचे देखील मोठे नुकसान झाले आहे. जामखेड तालुक्याला पावसाने झोडपले असून ढगफुटी सदृश्य पाऊस झाल्याने नद्यांना पूर आला आहे. जामखेड शहरातील विचारणा नदीला पूर आला असून दगडी पुलावरून पाणी वाहत आहे. तालुक्यात जामखेड शहर, जवळा, हळगाव , बोर्ले, नान्नज , साकत, खर्डा ,आदी गावांना ढगफुटी सदृश्य पावसाने शेतीचे व पिकाचे मोठे नुकसान झाले आहे. असून तालुक्यातील सर्वच नद्यांना पूर आला आहे. गावाकडील अनेक रस्ते पूर आल्याने



बंद झाले होते, पावसामुळे विद्यार्थ्यांना घरी सोडण्यासाठी पालकांना कसरत करावी लागली आहे.

जामखेड तालुक्यात गेल्या दोन दिवसापासून जोरदार पावसाच्या सरी व विजांच्या कडकडाट सह वादळी पाऊस झाला . या पावसाने तालुक्यात सर्वत्रच जोरदार हजेरी लावली आहे. यामध्ये शुक्रवारी दि १९ सप्टेंबर रोजी दुपारी ३ वाजता जामखेड, पाडळी, बावी, आरणगाव, धानोरा, फक्राबाद, डोणगाव , हळगाव, जवळा, बोर्ले, नान्नज सह आदी गावांना जोरदार पाऊस झाल्याने नदी नाले एक होत नदीना मोठे पूर आल्याने शेतीचे नुकसान झाले आहे.. जामखेड तालुक्यात तसेच घाटमाथ्यावर गेली दोन दिवसांपासून जोरदार पाऊस पडत असल्याने जामखेड शहरातून वाहणाऱ्या विंचरणा नदीला पूर आलेला आहे या नदीवरील दगडी पूल पाण्याखाली गेलेला आहे. मागील काही दिवसांपासून जामखेड तालुक्यात या पावसामुळे नदी नाले ओढे तुडंब भरलेले आहेत. जामखेड शहराला वरदान ठरणारा भुतवडा तलाव मागील काही दिवसापूर्वीच ओव्हर फ्लो झालेला आहे तसेच तालुक्यातील खैरी प्रकल्प, मोहरी प्रकल्प तुडुंब भरलेले आहे. जोरदार पाऊस पडत असल्यामुळे जामखेड शहरातून वाहणारी विंचरणा दुथडी वाहत आहे.विंचरणा नदीला आलेला पूर पाहण्यासाठी जामखेड शहरातील नागरिकांनी मोठी गर्दी केलेली होती.

# जालना-छत्रपती संभाजीनगर महामार्गावर खड्ड्यांचे साम्राज्य

जालना। प्रतिनिधी

बदनापूर जालना-छत्रपती संभाजीनगर या महत्वाच्या वर्दळीच्या महामार्गावरून प्रवास करणे दिवसेंदिवस जीवघेणे ठरत आहे. टोलचे पैसे भरूनही रस्त्यावर ठिकठिकाणी खड्ड्यांचे साम्राज्य निर्माण झाले असून, वाहनचालकांना अक्षरशः जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे.दररोज हजारो वाहनांची वर्दळ असलेल्या या महामार्गावर खड्ड्यांमुळे प्रवासी व वाहनचालकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. दुचाकीस्वारांना संतुलन राखणे कठीण झाले आहे, तर चारचाकी वाहने खड्ड्यांत उडून गंभीर अपघातांच्या घटनांमध्ये भर पडत आहे. आतापर्यंत अनेक वाहनांचे नुकसान होऊन प्रवासी जायबंदी झाल्याच्या घटना घडल्या आहेत.पावसाचे पाणी खड्ड्यांत साचल्याने त्यांची खोली लक्षात न आल्याने अपघातांचा धोका आणखी वाढला आहे. वाहनचालकांचे हाल होत असताना टोलवसुली करणारे ठेकेदार मात्र डोळेझाक करीत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

नागरिकांच्या वारंवार तक्रारींनंतरही संबंधितांनी रस्त्याच्या दुरुस्तीबाबत कोणतेही ठोस पाऊल न उचलल्याने लोकांच्या रोषाला तोंड फुटले आहे. ''टोल वसुली सुरू ठेवायची, पण सुविधा मात्र शून्य!'' असा सवाल आता जनतेकडून उपस्थित केला जात आहे.रस्त्यावरील खड्ड्यांमुळे वाहनचालकांना झटके खात करावा लागणारा प्रवास आणि दररोज वाढणाऱ्या अपघातांच्या घटनांनी महामार्गावरील सुरक्षिततेवर मोठा प्रश्नचिन्ह उभे केले आहे.

# अंबडमध्ये १५ दिवसांत तीन चोरी; शंकर ड्रेसेस दुकानातून साडेचार लाख

अंबड। प्रतिनिधी

अंबड शहरात पंधरा दिवसांमध्ये तीन ठिकाणी चोऱ्या झाल्या. जालना-बीड मुख्य मार्गावरील अंबड येथे कापड दुकानातून चोरट्याने तब्बल साडेचार लाखांची रोख रक्कम चोरून नेली. दरम्यान, शहरातील मोबाइल दुकानात चोरी करताना दुकान मालकाच्या सतर्कतेमुळे चोर पोलिसांच्या हाती लागला. त्याच चोराने शंकर ड्रेसेसमध्ये हात साफ केला होता. मात्र, पोलिसांनी आतापर्यंत शंकर ड्रेसेसच्या मालकाला चोरट्यांकडून केवळ पैशाची रिकामी पिशवी परत मिळवून दिली.

अंबड शहरातील जालना-बीड मुख्य मार्गावर असलेल्या शंकर ड्रेसेस या दुकानात रात्री २.२० वाजता समोरच्या बाजूने दुसऱ्या मजल्यावर चढून शटर उघडून दुकानात प्रवेश केला. काउंटरच्या ड्रॉवरमध्ये कापड खरेदीसाठी ठेवलेले ४ लाख तसेच मुलांचे पेमेंट देण्यासाठीचे ५० हजार रुपये, अशी तब्बल साडेचार लाखांची रोख रक्कम चोरट्याने चोरून नेली. सीसीटीव्हीत चोरटा कैद झाला असून त्याच्या चेहऱ्यावर रुमाल बांधलेला होता. त्यानंतर ७ सप्टेंबर रोजी रात्री १.५० वाजता शेख अरबाज अन्वर (रा. अशोक पेठ अंबड) यांच्या महाराष्ट्र द्वारजवळ मेन रोडवरील आयफोनवाला अंबड या मोबाइल दुकानाचे शटर तोडून एका १५ वर्षीय अल्पवयीन चोरटा बेकायदेशीर प्रवेश करून दुकानात चोरी करताना सापडला. या प्रकरणी शेख अरबाज अन्वर यांच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोलिस हवालदार संतोष घाणे करीत आहेत. घटनेचा अधिक तपास केला असता शंकर ड्रेसेसमधील साडेचार लाखांची चोरीही याच चोरट्याने केल्याचे समजते. विशेष म्हणजे या चोरीतील पैशानेच आयफोनवाला दुकानातून त्याने एक मोबाइल खरेदी केला. त्याच वेळी दुकानाची रेकी करून चोरीचा प्रयत्न केला. मात्र, तो यशस्वी झाला नाही.

# घनसावंगी पोलिसांनी शोध लावून ११ मोबाईल केले परत

जालना। प्रतिनिधी

घनसावंगी पोलिस ठाण्याच्या अंतर्गत नागरिकांचे हरवलेले २ लाख १९ हजार रुपये किंमतीचे विविध कंपन्यांचे एकूण ११ मोबाईल फोन शोधण्यात आले. ते नागरिकांना परत करण्यात आले.केंद्रीय दूरसंचार विभाग, भारत सरकार यांच्याकडून 'सीईआयआर' ही प्रणाली सुरू आहे. या प्रणालीचा उद्देश नागरिकांचे हरवलेले व चोरी गेलेले मोबाईल फोन शोधून ते परत मिळवून देणे हा आहे. याच अनुषंगाने, या प्रणालीच्या सहाय्याने हरवलेल्या मोबाईलचा शोध घेऊन नागरिकांना परत देण्यात आले. ही कामगिरी पोलीस अधीक्षक अजय कुमार बंसल, अपर पोलिस अधीक्षक आयुष नोपाणी, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. सिद्धेश्वर धुमाळ यांच्या मार्गदर्शनाखाली घनसावंगी पोलीस स्टेशनचे पोलिस निरीक्षक केतन राठोड, पोलिस अंमलदार स्वप्निल भिसे व स्थानिक गुन्हे शाखा, जालना येथील पोहेकों सागर बाविस्कर यांनी केली.

# शिवपट्टण ब्रॅण्डचा होणार जगभरात बोलबाला!

## कालाघोडा फेस्टिव्हलच्या संस्थापक संचालिका गीता कैस्टेलिनो यांची खर्डा भेट देत स्टॉल देण्याचे आश्वासन

कर्जत-जामखेडचे आमदार रोहितदादा पवार यांच्या संकल्पनेतून आणि सौ. सुनंदाताई पवार यांच्या मार्गदर्शनाखाली खर्डा येथे सुरू असलेली शिवपट्टण ग्रामोद्योग संस्था आज अल्पावधीतच आपली वेगळी छाप पाडत आहे. येथील महिलांनी तयार केलेल्या उच्च दर्जाच्या टॉवेल आणि जॅकेट्सची मागणी दिवसेंदिवस वाढत असून सामाजिक व वस्त्रोद्योग क्षेत्रातील जाणकार मंडळी संस्थेस भेट देत आहेत.

अशीच एक अभिमानास्पद भेट म्हणजे मुंबईतील उच्चभ्रू फोर्ट परिसरात दरवर्षी होणाऱ्या आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर गाजणाऱ्या 'कालाघोडा फेस्टिव्हल'च्या संस्थापक संचालिका गीता कैस्टेलिनो यांची! त्यांनी अलीकडेच खर्ड्यातील शिवपट्टण ग्रामोद्योग विकास संस्थेस भेट देऊन येथील कामकाजाची माहिती घेतली व संस्थेच्या कामाचे भरभरून कौतुक केले. शिवाय संस्थेत तयार होणाऱ्या टॉवेल व जॅकेट्सच्या विक्रीसाठी येत्या कालाघोडा फेस्टिव्हलमध्ये स्टॉल उपलब्ध करून देण्याचे आश्वासन त्यांनी दिले. यावेळी संस्थेच्या अध्यक्षा सौ. सविता विजयसिंह



गोलेकर, संचालिका सौ. सुरेखा चावणे, सचिव श्रीकांत बावडेकर, सचिन खलाटे, प्रशिक्षक बसवराज जोजन, आकाश सावलकर, व्यवस्थापक अशोक खटावकर, संचालक विजयसिंह गोलेकर, शशिकांत गुरसाळी, सलमान आतार, रामहरी गोपाळघरे, बंडूशेठ चावणे, सहाय्यक अर्जून भारती आदी उपस्थित होते.

ऐतिहासिक खर्डा शहराला पूर्वी 'शिवपट्टण' नावाने ओळखले जात होते. याच ऐतिहासिक नावावरून येथे निर्मित होणाऱ्या कापडाला 'शिवपट्टण' हा ब्रॅण्ड नेम देण्यात आला आहे. डिसेंबर महिन्यात पुण्यातील भिमथडी जत्रा, बारामतीतील कृषक कृषी प्रदर्शन तसेच जानेवारी महिन्यात मुंबईतील कालाघोडा फेस्टिव्हलमध्ये विक्री व प्रदर्शनासाठी स्वतंत्र स्टॉल मिळणार आहे. यामुळे 'शिवपट्टण' ब्रॅण्ड देश-विदेशातील पर्यटकांपर्यंत पोहोचणार असून खर्डा व परिसरासाठी हे भुषणावह ठरणार आहे. साधारणपणे ग्रामोद्योगातून तयार होणाऱ्या उत्पादनांना बाजारपेठ मिळवणे हे अवघड काम असते. मात्र, सुनंदाताई पवार यांच्या नियोजन व मार्गदर्शनामुळे शिवपट्टण संस्थेला योग्य प्लॅटफॉर्म मिळत आहे. याबद्दल येथील कामगार महिला समाधान व्यक्त करीत आहेत. संस्थेतून होणारी किरकोळ विक्री, बारामतीतील शारदानगर येथील शिक्षण संस्थेकडून होणारी खरेदी तसेच विविध प्रदर्शनांमधील वाढती मागणी लक्षात घेता उत्पादनाचा आवश्यक साठा तयार करण्याचे मोठे आव्हान उभे राहिले आहे. मात्र, हे आव्हान महिलांनी आनंदाने स्वीकारले असून, प्रसंगी शिफ्ट वाढवून उत्पादन वाढवण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला. त्याचबरोबर लवकरच आवश्यक ती यंत्रसामग्री वाढविण्यासाठी संस्थेच्या संचालक मंडळाने पाऊल उचलले आहे. येथे प्रशिक्षण घेऊन कायमस्वरूपी रोजगाराची संधी असल्याने खर्डा व परिसरातील गरजू पुरुष व महिलांनी संपर्क साधण्याचे आवाहन संस्थेच्या संचालक मंडळाने केले आहे.

# अग्रवाल युवा समितीकडून संस्कृतीची जोपासना -घनश्यामदास गोयल

## जम्मा जागरण मंडपाचे मान्यवरांच्या हस्ते भूमिपूजन

जालना। प्रतिनिधी

महाराज अग्रसेन यांच्या जयंती महोत्सवानिमित्त अग्रवाल युवा समितीच्या वतीने दरवर्षी धार्मिक, सामाजिक उपक्रम राबवले जातात, त्यांच्या उपक्रमांतून युवा पिढीत अध्यात्मिकतेची गोडी निर्माण होऊन संस्कृतीची जोपासना होते .असे मत उद्योजक घनश्यामदास गोयल यांनी व्यक्त केले. श्रीमती दानकुँवर महिला महाविद्यालयाच्या प्रांगणात मंगळवारी ( ता. २३) सुर सम्राट सुशील बजाज यांच्या सुमधुर वाणीतून होणाऱ्या विशाल रामदेव बाबा जम्मा जागरण मंडपाचे भूमीपूजन रविवारी ( ता. २१) आदित्य बगडिया, भूषण देविदान, जितेंद्र अग्रवाल यांच्या हस्ते विधिवत संपन्न झाले. याप्रसंगी अग्रवाल युवा समितीचे अध्यक्ष सौरभ पंच , सचिव जतीन अग्रवाल, उपाध्यक्ष सागर अग्रवाल, कोषाध्यक्ष नेतल अग्रवाल,कार्याध्यक्ष आदित्य अग्रवाल, सह कार्याध्यक्ष बजरंग अग्रवाल, संगीता गुप्ता,विजय बगड़िया, रिता अग्रवाल,जयश्री अग्रवाल यांची प्रमुख उपस्थिती होती.



उद्योजक घनश्यामदास गोयल यांनी भूमीपूजन कार्यक्रम स्थळी भेट देऊन युवकांना प्रोत्साहन दिले.प्रतिवर्षाप्रमाणे यंदा ही आपण कुटूंबियांसह उपस्थित राहणार असून भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून जम्मा जागरणाचा लाभ घ्यावा असे आवाहन घनश्यामदास गोयल यांनी केले. यावेळी अनिता अग्रवाल, अल्केश अग्रवाल, पंकज अग्रवाल, राहुल तालुका, अनुज बगड़िया, अजय अग्रवाल, पुनम अग्रवाल, रिता बगड़िया, हर्षिता अग्रवाल, आयुष अग्रवाल, नियती अग्रवाल, तन्वी अग्रवाल, इशा अग्रवाल, तुषार बगडिया, अक्षत नाव्हावाला, संयोगिता अग्रवाल यांच्यासह अग्रवाल युवा समितीचे सदस्य उपस्थित होते.

# विश्वास आणि पारदर्शकतेच्या बळावरच संस्थेची प्रगती -माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर

बीड । प्रतिनिधी

स्व.काकूंनी लावलेल्या छोट्याशा रोपाचे आज वटवृक्षात रूपांतर झाले आहे. संस्थेच्या या यशामागे जनतेने दाखवलेला विश्वास आणि आमचा पारदर्शक कारभार हाच खरा आधार आहे. असे प्रतिपादन माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी केले.

गजानन नागरी सहकारी बँकेची ३० वी वार्षिक सर्वसाधारण सभा तसेच आदर्श शिक्षण संस्था कर्मचारी सहकारी पतपेढी म. बीड यांच्या संयुक्त वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विलास बडगे हे होते. यावेळी व्यासपीठावर दिनकर कदम, अरुण डाके, प्रा. जगदीश काळे, नानासाहेब काकडे, मुखीद लाला, गणपत डोईफोडे, दिलीप खिस्ती, भागवत तावरे, डॉ. अरुण भस्मे, डॉ. राजा मचाले, अरुण गोरे, सुधाकर मिसाळ, अंकुश राठोड, सखाराम मस्के, अरुण बोंगाणे, सुभाष क्षीरसागर, ॲड. राजेश तांगडे, शुभम बरकसे आदी मान्यवर उपस्थित होते.

पुढे बोलताना माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर म्हणाले की,गजानन बँकेच्या १० शाखा आज सर्वसामान्यांना मदतीचा हात देत आहेत. २०२४ पर्यंत बँकेने आठ प्रथम पारितोषिके मिळवली आहेत. गतवर्षी बँकेच्या ठेवी १०० कोटी होत्या, तर यावर्षी त्या १२८ कोटींवर पोहोचल्या आहेत. या वाढत्या आर्थिक सामर्थ्यामुळे कर्ज मर्यादा



३ लाखांवरून थेट ७ लाखांपर्यंत वाढविण्यात आली आहे.विश्वास, गुणवत्ता आणि प्रामाणिकतेच्या जोरावर गजानन नागरी सहकारी बँक व आदर्श शिक्षण संस्था पतपेढी प्रगतीपथावर वाटचाल करत आहेत.गुणवत्ता व मेरिटच्या आधारे सेवेत पारदर्शकता वाढवण्याचा संकल्पही माजी मंत्र्यांनी व्यक्त केला

सध्या ७०० हून अधिक कर्मचारी बँकेत कार्यरत आहेत. केवळ आर्थिक अडचणींवर मात करण्यासाठी कर्ज मिळावे म्हणून बँकेचा वापर करण्याऐवजी आता सभासदांना विमा सुविधा देखील बँकेमार्फत पुरविल्या जात आहेत.

गेल्या आर्थिक वर्षात बँकेने ११० कोटी रुपयांचा नफा मिळविला असून या यशामागे सभासदांचा विश्वास आणि आमच्या कार्यपद्धतीतील पारदर्शकता हेच घटक महत्त्वाचे आहेत.असे ते म्हणाले.

या कार्यक्रमात श्री गजानन नागरी सहकारी बँक चौसाळा शाखेला उत्कृष्ट शाखा पुरस्कार मिळाल्याबद्दल अधिकारी आणि कर्मचारी यांचा सत्कार करण्यात आला. तसेच गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्या हस्ते करण्यात आला.

गजानन नागरी सहकारी बँकेचा वार्षिक अहवाल उपाध्यक्ष प्रा. जगदीश काळे यांनी सादर केला. तर आदर्श शिक्षण संस्था कर्मचारी सहकारी पतपेढीचा अहवाल चेअरमन अण्णासाहेब थिटे यांनी वाचला.

याप्रसंगी एम.ए.राऊत,प्रकाश राठोड,दिलीप शेळके नवनाथ कुलकर्णी कलंदर पठाण यांच्यासह श्री गजानन नागरी सहकारी बँकेचे अधिकारी पदाधिकारी कर्मचारी तसेच आदर्श शिक्षण संस्था कर्मचारी सहकारी पतपेढीचे सर्व संचालक मंडळ प्राचार्य मुख्याध्यापक, प्राध्यापक शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.श्रीराम जाधव यांनी केले तर उपस्थित मान्यवरांचे आभार प्रा. श्रीकांत कुलकर्णी यांनी मानले

# गायकवाडीत बिबट्याने घेतला दोन शेळ्यांचा बळी

पिंपळवंडी । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील पिंपळवंडी,अंमळनेर व शिरूर तालुक्यातील पांगरी-खोपटी या ठिकाणच्या डोंगरदर्यांनी बिबट्यांची मोठ्या संख्येने वाढ झाली असून हे बिबटे दिवसाढवळ्या शेतकऱ्यांच्या शेळ्या,गाई-वासरावर हल्ले करून त्यांचा बळी घेऊ लागल्याने परिसरात शेतकऱ्यांमध्ये भितीचे वातावरण निर्माण होऊन शेतात शेळ्या-गुरे राखणाऱ्या महिला व मुलांमध्ये



बिबट्याची दहशत निर्माण झाली आहे.गुरुवार दि.१९/०९/२०२५ रोजी गायकवाडी येथील शेतकरी अंगद माणिक केदार व बाबु दशरथ केदार हे नेहमीप्रमाणे गायकवाडी येथील शेतात शेळ्या घेऊन गेले होते. दुपारच्या वेळी अचानक बिबट्याने येऊन शेळ्यावर झडप घातली.या हल्ल्यात दोन शेळ्यांचा जागेवरच जीव घेतला.सदर शेतकऱ्यांनी यावेळी आरडा ओरड केली पण बिबट्याने ◀◀ पान २ वर

# माजलगाव शहरात प्रथमच युवा सेनेच्या वतीने दांडिया उत्सव

माजलगाव । प्रतिनिधी

नवरात्र उत्सवानिमित्त शहरात प्रथमच युवा सेना यांच्या वतीने भव्य दांडिया उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये प्रथम पारितोषिक पिठाची गिरणी, दुतीय पारितोषिक एलईडी टीव्ही , तृतीय पारितोषिक इलेक्ट्रिक शेगडी पारितोषिक



आहे नवरात्रभर शहरात देवीच्या आराधनेचे वातावरण रंगत असताना, तरुणाईला आकर्षित करणारा हा कार्यक्रम नव्या उत्साहाने पार पडणार आहे.

कार्यक्रमात युवतींसाठी पारंपरिक वेशभूषेत दांडिया,गरबा नृत्य स्पर्धा तसेच विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. शहरातील कुटुंबांसाठीही मनोरंजन व धार्मिक वातावरणाचा आनंद घेण्यासाठी हा उपक्रम विशेष ठरणार आहे.या उपक्रमाला माजलगावकरांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून शहरातील सामाजिक-सांस्कृतिक वातावरण अधिक रंगतदार होणार आहे.

स्थळ झेंडा चौक जुना तहसील रोड रोज सायंकाळी ७;०० ते वाजेपर्यंत ९:०० या वेळेस दांडिया राहतील यामध्ये जास्तीत जास्त माता भगिनींनी सहभागी व्हावे असे आव्हान युवा सेना तालुकाप्रमुख अभिजीत कोंबडे यांनी केले आहे.

# मंत्री पंकजाताई मुंडे यांची डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या निवासस्थानी भेट

बीड । प्रतिनिधी

राज्याच्या पशुसंवर्धन व पर्यावरण मंत्री तथा जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांनी रविवारी (दि.२१) राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट दिली.

या भेटीदरम्यान क्षीरसागर कुटुंबीयांच्यावतीने पंकजाताई मुंडे यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी भाजप जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख, माजी नगराध्यक्ष डॉ.दीपाताई क्षीरसागर, संपादक दिलीप खिस्ती, डॉ.सारिकाताई क्षीरसागर, भाजप युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष संजय आंधळे, डीसीसी बँकेचे माजी



अध्यक्ष आदित्य सारडा, चंपावती शिक्षण संस्थेचे चंद्रकांत मुळे, सलीम जहांगीर, भाजप अल्पसंख्याक नवगण शिक्षण संस्थेचे संचालक आमेर सिद्दिकी, राष्ट्रवादी काँग्रेस विद्यार्थी आघाडीचे जिल्हाध्यक्ष शुभम कातांगळे यांच्यासह भाजपसह राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

# त्र्यंबकेश्वर येथील पत्रकारांवर झालेल्या भ्याड हल्ल्याचा निषेध

## मराठी पत्रकार परिषद वडवणी तालुक्याच्या वतीने पोलीस स्टेशनला दिले निवेदन

वडवणी । प्रतिनिधी

त्र्यंबकेश्वर नाशिक येथील पत्रकार योगेश खरे पत्रकार किरण ताजने.पत्रकार अभिजीत सोनवणे सह इतर पत्रकारांवर झालेल्या भ्याड हल्ल्याच्या निषेधार्थ मुख्य विश्वस्त एस.एम.देशमुख सर तसेच डिजिटल मीडियाचे राज्य अध्यक्ष अनिल वाघमारे यांच्या सूचनेवरून मराठी पत्रकार परिषद शाखा वडवणी. डिजिटल मीडिया वडवणी तालुका तसेच हल्ला विरोधी कृती समिती




यांच्या वतीने वडवणी पोलीस स्टेशन येथे निवेदन देऊन हल्लेखोरांवर कठोर कारवाई करावी अशी मागणी मराठी पत्रकार परिषद वडवणी तालुक्याच्या वतीने करण्यात आली यावेळी मराठी पत्रकार परिषदेचे वडवणी तालुका अध्यक्ष सतीश सोनवणे ज्येष्ठ पत्रकार सुधाकर पोटभरे. डिजिटल मीडिया तालुकाध्यक्ष ओमप्रकाश साबळे. संपादक ज्ञानेश्वर लंगे.पत्रकार महेश सदरे पत्रकार धम्मपाल डावरे पत्रकार वाजेद पठाण पत्रकार गीतांजली लव्हाळे पत्रकार संभाजी लांडे पत्रकार राम चौरे पत्रकार हर्षद उंडाळकर, पत्रकार अतुल जाधव सह अदी पत्रकार यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते..

# गेवराई बाजार समितीच्या सभापती व उपसभापतींची आज निवड

## माजी आमदार अमरसिंह पंडित यांच्या निर्णयाकडे सर्वांचे लक्ष

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती मुजीब पठाण आणि उपसभापती विकास सानप यांनी आपल्या पदाचे राजीनामे दिल्यामुळे रिक्त झालेल्या सभापती व उपसभापती पदाची निवड आज होणार आहे. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून सहाय्यक निबंधक दिपक पवळ काम पाहणार आहेत. यामुळे गेवराईमध्ये राजकीय हालचालींना वेग आला असून सभापती आणि उपसभापती पदासाठी इच्छुकांनी मोर्चे बांधणी सुरु केल्याचे दिसून येत आहे. माजी आमदार अमरसिंह पंडित यांच्या नेतृत्वाखालील गेवराई कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये कोणाची वर्णी लागणार आणि अमरसिंह पंडित कोणता निर्णय





घेणार आहेत याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

मराठवाड्यातील आग्रगण्य बाजार समिती म्हणून गेवराई कृषी उत्पन्न बाजार समितीची ओळख आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे नेते तथा माजी आमदार अमरसिंह पंडित यांच्या नेतृत्वाखाली या बाजार समितीने मोठा नावलौकिक मिळविला आहे. सुमारे अडीच वर्षांपूर्वी बाजार समितीच्या संचालक मंडळाची निवडणुक झाली. निवडणुकीत अमरसिंह पंडित यांच्या गटाचे सर्व उमेदवार बहुमताने निवडून आले. बाजार समितीचे १८ संचालक अमरसिंह पंडित यांच्या गटाचे असल्यामुळे एकहाती सत्ता त्यांच्या गटाकडे आहे. गेवराई तालुक्याच्या राजकारणात बाजार समितीच्या सभापती आणि उपसभापती पदाला महत्वाचे स्थान आहे. अमरसिंह पंडित यांनी सभापती पदासाठी मुजीब पठाण यांच्या माध्यमातून मुस्लिम चेहरा आणि उपसभापती पदासाठी विकास सानप हा ओबीसी चेहरा देऊन सामाजिक समतोल राखण्याचा प्रयत्न केला होता. मागील वेळी अतिशय चुरशीच्या निवडीमध्ये ◀◀ पान २ वर

# ना. पंकजाताई मुंडेंना सावरगांव ग्रामस्थांनी दिले दसरा मेळाव्याचे निमंत्रण



बीड । प्रतिनिधी

राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांना आज सावरगांव घाट येथील ग्रामस्थांनी प्रत्यक्ष भेट घेऊन दसरा मेळाव्याचे रितसर निमंत्रण दिले. आपला दसरा, आपली परंपरा मेळाव्याची तयारी सध्या जोरदार पणे सुरू आहे.


श्री संत भगवान बाबा स्मारक मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष संदेश सानप यांच्या नेतृत्वाखाली सावरगांव घाट येथील ग्रामस्थांच्या एका शिष्टमंडळाने ना. पंकजाताईंची आज बीड मध्ये भेट घेतली व सावरगांव येथे दरवर्षी होत असलेल्या दसरा मेळाव्याचे निमंत्रण दिले. निमंत्रण देताना ग्रामस्थ म्हणाले की,राष्ट्रसंत भगवान बाबा यांचे जन्मस्थळ असलेल्या मौजे सावरगांव घाट ता. पाटोदा जि. बीड येथील भगवान ◀◀ पान २ वर

## ओबीसी मेळाव्याच्या नियोजनासाठी

# आज गेवराईत बैठक

तलवाडा । प्रतिनिधी

अ.भा.महात्मा फुले समता परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा सकल ओबीसी समाजाचे नेते मा.ना.छगनरावजी भुजबळ यांच्या प्रमुख उपस्थितीत रविवार दि.२८ सप्टेंबर २०२५ रोजी दुपारी ठिक चार वाजता बारा बलुतेदार व आठरा आलुतेदार प्रवर्गातील तमाम ओबीसी समाजाचे आरक्षण वाचविण्यासाठी महाएल्गार मेळावा




आयोजित करण्यात आला असून या मेळाव्यासंदर्भात विचारविनिमय करण्यासाठी महात्मा फुले विद्यालय, भगवान नगर गेवराई याठिकाणी उद्या सोमवार दि.२२ सप्टेंबर रोजी सकाळी ठिक दहा वाजता ओबीसी समाजाचे प्रमुख कार्यकर्ते व ओबीसी समाज बांधव यांच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. तरी सोमवारी गेवराई येथील महात्मा फुले विद्यालयात होणाऱ्या ◀◀ पान २ वर


# माजलगाव शहरात धाडसी चोरी

## चोरट्यांचा १५ लाखाच्या दागिन्यावर डल्ला

माजलगाव । प्रतिनिधी

शहरापासून जवळच असलेल्या पूर्वा जिनींग,साईनगरी भागात राहणारे गोपाल सुभाष लड्डा हे बाहेरगावी गेले असता चोरांनी बाजार भावनुसार १५ लाख रुपयांचे दागिने २५ हजार नगदी व इतर ऐवज लांबवल्याची घटना दि १८ सप्टेंबर रोजी उघडकीस आली. याप्रकरणी शहर पोलिसात गुन्हा दाखल झाला असून मागील दोन वर्षातील एकाही चोरी प्रकरणाचा तपास लागला नसताना वाढत्या चोरीच्या घटनानी नागरिकांतभीतीचे वातावरण आहे.

माजलगाव शहर पोलिसात या प्रकरणी दाखल फिर्यादित गोपाल लड्डा वय ४५ हे आपल्या मुळगावी टाकरवण येथे दि १६ सप्टेंबर रोजी गेले असता ◀◀ पान २ वर






# माहूर ते बेलगाव रेणुकामातेच्या ज्योतीचे ग्रामस्थांकडून जोरदार स्वागत,आज घटस्थापना,शारदीय नवरात्र उत्सवाचे आयोजन

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील बेलगाव येथील तरुण दरवर्षी श्री क्षेत्र माहूरगड ते बेलगाव ४५० कि.मी.चे अंतर पायी चालत रेणुकाआईची ज्योत मोठ्या भक्ती भावाने उत्साहात घेऊन येतात. या पायी ज्योत सोहळ्याचे बेलगाव ग्रामस्थ व पंचक्रोशीतील भाविकाकडून मोठ्या उत्साहात जोरदार स्वागत करण्यात आले.आज देवीच्या मंदिरात घटस्थापना होणारा आहे.या नवरात्र उत्सवानिमित्त ग्रामस्थांकडून नऊ दिवस शारदीय नवरात्र उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे या महोत्सवाचा पंचक्रोशीतील भाविकांनी लाभ घ्यावा असे आवाहन समस्त गावकरी मंडळी बेलगाव यांनी केले आहे.

आष्टी तालुक्यातील बेलगाव येथील रेणुकामाता देवस्थानच्यावतीने सोमवार दि.२२ ते ०१ सप्टेंबर या काळात रेणुकामातेचा नवरात्रोत्सव आरंभ होत आहे.यानिमित्ताने बेलगाव येथील जागृत देवस्थान माहूरगडचे उपस्थान म्हणून ओळखल्या जाणाऱ्या रेणुकामाता मंदिरात आज सोमवार दि.२२ सप्टेंबर रोजी विधिवत पुजाअर्चा करून बेलगाव ग्रामस्थ व देवीभक्तांच्या उपस्थितीत घटस्थापना करण्यात येणार आहे.



दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी बेलगाव येथील तरुणांनी श्री क्षेत्र माहूरगड ते बेलगाव ४५० कि.मी.चे अंतर पायी चालत देवीची ज्योत घेऊन आले असून या पायी ज्योत चे ग्रामस्थांच्या वतीने जोरदार स्वागत करण्यात आले. गेल्या १७ वर्षांपासूनची ही परंपरा कायम आहे.यामध्ये जवळपास २०० तरुण सहभागी होतात. बेलगाव आणि परिसरात रेणुकामातादेवीचे महात्म आहे.संपूर्ण पंचक्रोशीत ही देवी नवसाला पावते म्हणून तिची ख्याती आहे.निसर्गरम्य वातावरणात असलेले देवीचे मंदिर हे राज्यातील कानाकोपऱ्यातुन व आष्टी तालुक्यातील भाविकांसाठी एक तीर्थक्षेत्र म्हणून ओळखले जाते.रेणुकामातेचे महात्म्य पूर्ण राज्यात प्रसिद्ध आहे. या देवस्थानला शासनाचा ''क'' दर्जा प्राप्त असून या देवस्थान परिसरात सद्यस्थितीला कोट्यावधी रुपयाचे विकास कामे प्रगतीपथावर असून लवकरच हे देवस्थानचा कायापालट होणार आहे.बेलगाव ग्रामस्थ मोठ्या श्रद्धेभावाने नवरात्र महोत्सव साजरा करतात. ९ दिवस विविध कार्यक्रमाची धार्मिक कार्यक्रमाची रेलचेल पाहायला मिळते.शेवटच्या दिवशी महाप्रसादाने सांगता होणार असून या नवरात्र उत्सवाचा पंचक्रोशीतील भाविकांनी लाभ घ्यावा असे आवाहन समस्त ग्रामस्थ बेलगाव यांनी केले आहे.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# विद्यापीठाच्या परीक्षा शुल्कात केलेली वाढ अन्यायकारक; विद्यार्थी संघर्ष कृती समितीचा आरोप

पुणे । प्रतिनिधी

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने परीक्षेच्या शुल्कात केलेली वाढ अन्यायकारक असल्याचा आरोप करत विद्यापीठ विद्यार्थी संघर्ष कृती समितीने परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या संचालकांना आज लेखी निवेदन दिले. या निवेदनात परीक्षा अर्ज भरण्याच्या मुदतीत आठ दिवसांची अतिरिक्त वाढ देण्याची मागणीही करण्यात आली आहे.कृती समितीच्या मते, अनेक महाविद्यालयांनी अद्याप विद्यार्थ्यांच्या पात्रता प्रक्रियेची पूर्तता केलेली नसल्याने विद्यार्थी मोठ्या अडचणीत आले आहेत. परिणामी, परीक्षा अर्ज भरण्याची प्रक्रिया वेळेत पूर्ण होणे कठीण झाले आहे. अशा परिस्थितीत विद्यापीठाने मुदतवाढ देणे अत्यावश्यक असल्याचे समितीने स्पष्ट केले.






समितीने पुढे म्हटले आहे की, राज्यभरात सध्या अतिवृष्टीमुळे शेतकरी आणि नागरिकांवर ओढवलेल्या ओल्या दुष्काळाच्या संकटात विद्यार्थ्यांना जास्तीचे शुल्क भरण्यास भाग पाडणे अमानवीय ठरेल. या वाढीव शुल्काचा निर्णय तात्काळ मागे घ्यावा, अशी ठाम मागणी निवेदनात करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांच्या अडचणींचा विचार करून विद्यापीठ प्रशासनाने त्वरित निर्णय घेण्याची जबाबदारी पार पाडावी, अन्यथा संघर्ष तीव्र करण्याचा इशाराही समितीने दिला आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न नाशिक, अहिल्यानगर आणि पुणे जिल्ह्यातील महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांच्या परीक्षांसाठी अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. मात्र, यावेळी विद्यापीठाने परीक्षा शुल्कात तब्बल २० टक्क्यांची वाढ जाहीर केली असून विद्यार्थ्यांवर याचा अतिरिक्त आर्थिक भार पडणार आहे. यासंदर्भात विद्यापीठाने अधिकृत परिपत्रक जारी केले आहे.

विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेने आणि परीक्षा व मूल्यमापन मंडळाने यापूर्वी २०१८ ते २०२० दरम्यान १५ टक्के शुल्क वाढ करण्यास मान्यता दिली होती. तथापि, कोरोनाच्या काळात विद्यार्थ्यांवरील भार लक्षात घेऊन ही वाढ अंमलात आणली गेली नव्हती. त्यामुळे जवळपास सात वर्षांपासून परीक्षा शुल्कात वाढ करण्यात आलेली नव्हती.

# काँग्रेसमुक्त भारताच्या नादात, भाजपाच काँग्रेसयुक्त - सपकाळ

पुणे । प्रतिनिधी

आघाडी, युती करताना काँग्रेसचे मोठे नुकसान होत असून पक्ष कमजोर होत असल्याबाबतच्या काँग्रेस कार्यकर्त्यांच्या भावना आहेत. त्यामुळे आगामी स्थानिक स्वराज्य स्वराज्य संस्थाच्या निवडणुका लढविताना संपूर्ण राज्यात सरसकट आघाडी होणार नाही. स्वबळावर किंवा आघाडी करून निवडणुका लढवायच्या याबाबतचा निर्णय घेण्याचे अधिकार हे त्या-त्या स्थानिक पातळीवरच देण्यात आले आहेत, असे काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी स्पष्टपणे सांगितले.



पुणे श्रमिक पत्रकार संघातर्फे वार्तालाप आयोजित करण्यात आला होता. यामध्ये पत्रकारांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांवर हर्षवर्धन सपकाळ यांनी भाष्य केले. ते म्हणाले की, काँगेस पक्षातील काही उणीवा, त्रुटी दूर करण्याच्या अनुषंगाने प्रयत्न सुरू आहेत. तालुका पातळीपासूनच संघटना मजबूत करण्यासाठी विशेष कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. पुण्यातील गटबाजी आता राहिलेली नाही. सर्व एका दिलाने कामाला लागले आहेत. प्रदेश कार्यकारिणीतही समावेशकता आणण्यात आली आहे. लोकसभा, विधानसभा निवडणुका लढताना काही तडजोडीत उणिवा राहिल्या. त्यामुळे आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी तिकीट वाटप सुरळीत होणार आहे. प्रत्येक विधानसभा मतदार संघनिहाय निरीक्षक नियुक्त केले आहेत. हे निरीक्षक, जिल्हाध्यक्ष स्थानिक परिस्थिती विचारात घेऊन निवडणुकांबाबतचा योग्य तो निर्णय घेणार आहेत, असे सपकाळ यांनी सांगितले.तोडा-फोडा-झोडा आणि राज्य करा, या रणनीतीचा वापर भाजपकडून केला जात आहे.

जातीय तेढ निर्माण करून पोळी भाजून घेण्याचे कामही भाजप कडून सुरू आहे. आरक्षणाच्या गोंधळामुळे मराठा व ओबीसी समाजामध्ये भांडणे होऊ लागली आहेत, असेही सपकाळ यांनी ठामपणे मांडले. जातीनिहाय जनगणना करून त्यानुसार आरक्षण दिल्यास आरक्षणाचा प्रश्न सुटेल, अशी मागणी केली असल्याचेही त्यांनी नमूद केले आहे. मतचोरी, मतदार याद्यांमधील घोळ, शेतकरी वर्गाचे प्रश्न, वाढती बेरोजगारी यांसह अन्य प्रश्नांसाठी पदयात्रा, मोर्चे, आंदोलन यालाच प्राधान्य देण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले आहे.

# माथाडी कायदा बदलांविरोधातील सत्याग्रह आंदोलन तुर्तास स्थगित ; पण आंदोलनाचा इशारा कायम



पुणे । प्रतिनिधी

माथाडी कामगार कायद्यात होऊ घातलेल्या बदलांविरोधात महाराष्ट्र राज्य हमाल मापाडी महामंडळाच्या वतीने १६ सप्टेंबरपासून सुरू केलेले सत्याग्रह आंदोलन तुर्तास स्थगित करण्यात आले आहे. ज्येष्ठ कामगार नेते डॉ. बाबा आढाव यांच्या नेतृत्वाखाली सात दिवस आंदोलन करण्यात येणार होते. त्यामध्ये सहा जिल्ह्यातील प्रतिनिधी सहभागी झाले होते.विधान परिषद आमदार योगेश टिळेकर व विधानसभा आमदार भिमराव तापकीर यांनी आंदोलन स्थळी डॉ. आढाव यांची भेट घेतली.

कामगार कायद्याचा मसुदा कामगार संघटनांना विश्वासात घेऊनच तयार करण्यात येईल. तसेच, खोट्या माथाडी आणि श्रमजीवी कामगारांना काढण्यासाठी कायद्यात बदल करण्यात आले आहेत. खऱ्या माथाडी कामगारांच्या विरोधात काही बदल झाले असतील तर ते झालेले अनावश्यक बदल विचार विनिमय करून काढून टाकण्यात येईल, असे आश्वासन दोन्ही आमदारांनी दिले. टिळेकर यांनी कामगार मंत्री आकाश फुंडकर यांच्याशी डॉ. आढाव यांच्याशी फोन वरून संभाषण करून दिले.

त्यावेळी पुढील आठवड्यात आपल्या कृती समितीची बैठक लावण्यात येईल तसेच मसुदा अंतिम करण्याअगोदर आपणास दाखवण्यात येईल, असे आश्वासन मंत्र्यांनी दिले. त्यानुसार शनिवारी (दि.२०) दुपारी आंदोलन स्थगित करण्यात आले. मात्र, दिलेले आश्वासन पूर्ण न केल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा डॉ. आढाव यांनी यावेळी दिला.

# रस्त्यावरील खड्ड्यात टेबल टाकून ग्रामस्थांनी उघडल चहापानाचा हॉटेल ; खेड तालुक्यात खड्ड्यांविरोधात अनोखे आंदोलन

खेड: राजगुरुनगर ते भीमाशंकर मार्गावरील सातकरस्थळ येथील वाडा रस्त्यावर खड्ड्यांच्या समस्येमुळे वैतागलेल्या ग्रामस्थांनी आणि ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांनी अनोखे आंदोलन केले. रविवारी (दि. २१) या रस्त्यावरील खड्ड्यात टेबल टाकून चहापान सुरू करत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दुर्लक्षाचा निषेध नोंदवला आहे.

माजी आमदार दिलीप मोहिते पाटील आणि विद्यमान आमदार बाबाजी काळे यांच्या घराकडे जाणाऱ्या या रस्त्यावरील खड्ड्यांमुळे रोज अपघात होत असताना, या आंदोलनाने राजगुरुनगर परिसरात मोठी चर्चा रंगली आहे. हा रस्ता राजगुरुनगर ते भीमाशंकर मार्गाचा भाग असून, पश्चिम भागातील ५०हून अधिक गावे आणि बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेल्या भीमाशंकरला जाणारी वाहने याच मार्गाचा वापर करतात. मात्र, पावसाळ्यात रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडले असून, राजगुरुनगर आणि सातकरस्थळ परिसरात त्यांची संख्या आणि खोली अधिक आहे.गावाचे सरपंच ऋतिका सातकर, माजी सरपंच अजय चव्हाण आणि सहकाऱ्यांनी अनेकदा सार्वजनिक बांधकाम विभागाकडे पाठपुरावा केला, परंतु दुरुस्तीकडे दुर्लक्ष झाले. विशेष म्हणजे, विकासकामांचे श्रेय घेण्यासाठी स्पर्धा करणारे आमदार बाबाजी काळे आणि माजी आमदार दिलीप मोहिते पाटील यांचे या रस्त्याकडे लक्ष नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.




रस्त्याच्या दुरवस्थेमुळे अपघातांना सामोरे जावे लागणाऱ्या नागरिकांनी अखेर संताप व्यक्त करत थेट खड्ड्यात टेबल टाकून चहापान सुरू केले.या आंदोलनात जिल्हा परिषदेचे माजी सदस्य अनिलबाबा राक्षे, अजय चव्हाण, आकाश सातकर, अभिजीत सातकर, साहेबराव सातकर, विकास थिगळे, पांडुरंग आरुडे, योगेश कोहिनकर, सुनील बलदोटा, बाबासाहेब कांबळे यांच्यासह अनेक ग्रामस्थ सहभागी झाले. रस्त्याची दुरुस्ती होत नाही, म्हणून आम्ही खड्ड्यातच 'हॉटेल' उघडले, अशी उपरोधिक टिप्पणी आंदोलकांनी केली. जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुका जवळ आल्या असताना, हे आंदोलन राजकीय दृष्टिकोनातूनही प्रभावी ठरण्याची शक्यता आहे. ग्रामस्थांनी रस्त्याच्या दुरवस्थेकडे लक्ष वेधत प्रशासन आणि लोकप्रतिनिधींना जागे करण्याचा प्रयत्न केला आहे. या आंदोलनामुळे रस्ते दुरुस्तीच्या मागणीला बळ मिळेल, अशी आशा ग्रामस्थांना आहे. रस्त्याची दुरुस्ती होईपर्यंत आम्ही असे अनोखे आंदोलन करत राहू. लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाने आता तरी जबाबदारी घ्यावी, असे सरपंच ऋतिका सातकर यांनी सांगितले. आता या आंदोलनानंतर प्रशासन आणि लोकप्रतिनिधी काय पावले उचलतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे

# न्यायालयीन कामकाजात राजकारण आणण्याचा प्रयत्न' - माजी सरन्यायाधीश डी. वाय. चंद्रचुड

**नवी दिल्ली । वृत्तसेवा**

देशात सध्या न्यायालयीन कामकाजात मोठ्या प्रमाणावर राजकारणण्याचा प्रयत्न केला जात आहे. दुर्दैवाची गोष्ट म्हणजे, काही वकीलच हे जाणीवपूर्वक करत आहेत. ही बाब न्यायव्यवस्थेच्या दृष्टीने चिंतेची आहे, असे परखड मत सर्वोच्च न्यायालयाचे माजी सरन्यायाधीश डी. वाय. चंद्रचूड यांनी व्यक्त केले. एखाद्या न्यायाधीशाने दिलेला निर्णय अनेकांना पटत नाही. त्यावर त्या निर्णयावर टीका केली जात नाही तर न्यायाधीशाच्या हेतूवर शंका घेतली जाते, असे घडता कामा नसल्याचेही त्यांनी नमूद केले.

एका मुलाखतीत डी. वाय. चंद्रचूड यांनी हे वक्तव्य केले आहे. डी. वाय. चंद्रचूड म्हणाले, एखादा निर्णय आवडला नाही तर त्याबाबत कुणालाही त्याबाबत मत मांडू शकता. निर्णय आवडला नाही म्हणून तुम्ही टीका करु शकता किंवा निर्णय आवडला म्हणून स्वागतही करु शकता. पण हल्ली



असा एक ट्रेंड आला आहे न्यायाधीशांनाच नावं ठेवली जातात. ही बाब दुर्दैवी आहे. निर्णय पटला नाही तर ते मला अगदीच मान्य नाही. पण त्यामागे न्यायाधीशांचा काहीतरी हेतू आहे हे सांगणे हे योग्य नाही. सगळे वकील असे नाही पण काही वकील असे करतात जे योग्य नाही. सध्या न्यायालयाच्या कामकाजात खूप जास्त राजकारण आणण्याचा प्रयत्न केला जात आहे. त्यामुळे एखादा निर्णय पटला नाही की थेट त्या न्यायाधीशाच्या हेतूवर संशय घेतला जातो. न्यायदानाचे शिक्षण देणाऱ्या संस्थांमध्ये तर हे रोज होते की तुम्ही एखाद्या निर्णयाला पाठिंबा देता किंवा एखाद्या निर्णयावर टीका करता. पण न्यायाधीशांवर जेव्हा हेतू लादला जातो तेव्हा न्यायव्यवस्थेवर जो लोकांचा विश्वास आहे त्याला कुठे तरी तडा देण्याचे काम केले जात आहे, असेही त्यांनी म्हटले.यशवंत वर्मा प्रकरणात संसदेने समिती तयार केली आहे. त्यात तीन सदस्य आहेत. या समितीने या प्रकरणी तपास सुरु केला आहे. यातील सर्वात महत्त्वाचा भाग काय? की त्यांना त्यांची बाजू मांडण्याचा पूर्ण अधिकार प्रदान केला जावा. मी मागच्या २५ वर्षांपासून न्यायाधीश म्हणून काम केले आहे. त्याआधी मी वकिलीही केली आहे.

माझा हा अनुभव आहे की अनेकदा आपल्या समोर जे येते ते सत्य नसतं, त्यापेक्षा वेगळ असतं. सत्याचे अनेक पैलू असतात ते नंतर समोर येतात. त्यामुळे यशवंत वर्मा प्रकरणात समितीसमोर सत्य आले पाहिजे. त्यानंतर ते समाजासमोरही आले पाहिजे, असे मत त्यांनी व्यक्त केले.

# सराईत गुन्हेगार विकास उर्फ काज्या चोरे स्थानबद्ध ; शिरूर पोलिसांची धडक कारवाई

पुणे: शिरूर पोलिस ठाण्याच्या रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगार विकास उर्फ काज्या बाबाजी चोरे (वय २५, रा. डोंगरगण, ता. शिरूर) यास एमपीडीए कायद्याखाली स्थानबद्ध करण्यात आले आहे. चोरे याच्यावर वारंवार प्राणघातक हल्ले करून जिवे मारण्याचा प्रयत्न, विनयभंग, गावठी पिस्तुले जवळ बाळगून दहशत निर्माण करणे, तसेच अवैध मुरुम उत्खनन व वाहतूक करणे असे गंभीर गुन्हे दाखल आहेत. २०२२ ते २०२५ या काळात त्याच्याविरुद्ध शिरूर पोलिस ठाण्यात एकूण पाच गुन्हे नोंदवले गेले आहेत.

पुणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक संदीप सिंह गिल्ल यांच्या शिफारशीवरून आणि जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांच्या आदेशानुसार शिरूर पोलिसांनी विकास चोरे याला ताब्यात घेऊन शनिवारी (दि. २०) मध्यवर्ती कारागृह अमरावती येथे रवाना केले.

गेल्या दोन वर्षांत शिरूर पोलिस ठाण्याने पाच सराईत गुन्हेगारांना स्थानबद्ध करून




तालुक्यातील गुन्हेगारीवर कडक आळा घातला आहे. पुढेही एमपीडीए, मोक्का तसेच भारतीय न्याय संहितेतील कलमान्वये कठोर कारवाई केली जाणार असून गुन्हेगारांची गय केली जाणार नाही, असा इशारा शिरूरचे पोलिस निरीक्षक संदेश केंजळे यांनी दिला.

ही कारवाई पोलिस उप अधीक्षक रमेश चोपडे, उपविभागीय पोलिस अधिकारी प्रशांत ढोले, स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे पोलिस निरीक्षक अविनाश शिळीमकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक शुभम चव्हाण, सहायक फौजदार महेश बनकर, हवालदार मंगेश थिगळे, परशराम सांगळे तसेच पोलीस कर्मचारी सचिन भोई, नितेश थोरात, अजय पाटील, विजय शिंदे, निखील रावडे, अंबादास थोरे व निरज पिसाळ यांनी केली.

# बनावट दस्तऐवज बनवून जमीन खरेदी केल्याप्रकरणी एकास अटकपूर्व जामीन मंजूर

पुणे - सासवड येथील मालमत्ता मूळ मालकाच्या माहितीशिवाय जमिनीच्या बनावट कागदपत्रांचा वापर करून विकण्याचा प्रयत्न केला होता. बोगस व्यक्तीस थांबवून खरेदी खत करणाऱ्यास अटकपूर्व जामीन मंजूर करण्यात आला. सत्र न्यायाधीश ए. एस गांधी यांनी हा आदेश दिला.

या प्रकरणाची पार्श्वभूमी अशी की, विवेक इंगळे व इतर व्यक्तींनी खानवडी तालुका पुरंदर येथील १ हे. २० आर इतका जमिनीचा व्यवहार मूळ मालकाच्या संमती विरुद्ध ठरवला. व तोतया व्यक्ती उभी करून खरेदी खत करून व कुलमुखत्यार पत्र बनवून जमीन बळकावून विकण्यात आली होती.

याप्रकरणी सासवड पोलिस स्टेशन येथे जमिनीच्या मूळ मालकांनी तक्रार दाखल केली होती या गुन्ह्यात एकूण सात व्यक्ती विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.भारतीय न्याय संहितेचे कलम ३१८,३३८,३३६(३),३४०,६१ अन्वये दाखल गुन्ह्यात विवेक इंगळे याने अटकपूर्व जामीन मिळावा यासाठी ड. पवार व ड. प्रणित नामदे यामार्फत न्यायालयात अर्ज सादर करण्यात आला होता.

याप्रकरणी न्यायालयात युक्तिवाद करतेवेळी प्रस्तुत गुन्ह्यात आरोपीचा कसलाही सहभाग दिसून



येत नाही. त्याला ह्या गुन्ह्यात नाहक गोवण्यात आले असून तो या व्यवहारात कसलाही लाभार्थी नाही.तसेच गुन्हा दाखल करण्यास दोन महिन्याच्या विलंब आहे. असा युक्तिवाद आरोपी तर्फे ड अजित पवार व ड प्रणित नामदे यांनी न्यायालयात केला. हा युक्तिवाद ग्राह्य धरून जिल्हा व सत्र न्यायाधीश ए. एस गाँधी यांनी आरोपीचा अटकपूर्व जामीन अर्ज मंजूर केला.

# वनस्पती शास्त्रज्ञ डॉ. हेमा साने कालवश!

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यातून निधनाची एक दुःखद बातमी समोर आली आहे. ज्येष्ठ वनस्पती शास्त्र डॉ. हेमा साने यांचं निधन झालं आहे. त्यांनी वयाच्या ८५ व्या अखेरचा श्वास घेतला. त्यांनी आयुष्यभर निसर्गाशी एकरुप होऊन जगण्याची जीवनशैली आत्मसात केली होती. पुण्यातील विजेविना जीवनशैली जगणाऱ्या आजी असं त्यांना ओळखलं जात होतं.



पुण्यातील मध्यवर्ती भागातील जोगेश्वरी मंदिराशेजारील शीतलादेवी पार भागात असणाऱ्या पडक्या वाड्यात त्या राहत होत्या. विशेष म्हणजे त्यांनी घरात विजेचे कनेक्शन घेतले नव्हते. घरात टीव्ही फ्रीज ही उपकरणे नव्हती. हेमा साने यांनी वनस्पतीशास्त्र विषयात एम. एस्सी. पीएच.डी. पदवी संपादन केली. त्यांचा जन्म १३ मार्च १९४० झाला. त्या पुण्यातील आबासाहेब गरवारे महाविद्यालयात वनस्पतीशास्त्र विभागाच्या प्रमुख म्हणून सेवानिवृत्त झाल्या होत्या. त्यांनी अत्यंत साधी राहणी आत्मसात केली होती.

त्यांनी वनस्पती शास्त्राची तीसहून अधिक पुस्तके लिहिली आहेत. हे लेखन करण्यासाठी कंदिलाचा प्रकाश आणि दिवसा सूर्यप्रकाशात ही पुस्तक लिहून पूर्ण केली. त्यांना पर्यावरण, निसर्ग संवर्धन क्षेत्रातील विविध नामवंत संस्थांकडून पुरस्कार प्रदान करण्यात आले होते.

# रिंग रोडच्या भूसंपादनाला गती! पीएमआरडीए आयुक्तांचा आढावा व तातडीचे आदेश

**पिंपरी । प्रतिनिधी**

**प्रस्तावित रिंग रोडच्या भूसंपादन प्रक्रियेसंबंधी सुरू असलेल्या कार्यवाहीचा पीएमआरडीएचे महानगर आयुक्त डॉ. योगेश म्हसे यांनी प्रशासकीय यंत्रणांकडून आढावा घेतला. टप्पा एक, दोन, तीन आणि चारसंदर्भात सुरू असलेल्या कार्यवाहीबाबत आढावा घेऊन तातडीने भूसंपादन प्रक्रिया आणि मोजणीसाठी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे प्रस्ताव पाठवण्याचे निर्देश त्यांनी यावेळी दिले.**

पुणे शहर आणि परिसरातील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी प्रशासकीय यंत्रणांमार्फत विविध उपाययोजना करण्यात येत आहे. यात प्रामुख्याने प्रस्तावित रिंग रोडसह इतर महत्त्वाचे काही रस्ते रुंदीकरणाच्या अनुषंगाने कार्यवाही सुरू आहे. रिंग रोड टप्पा एक, दोन, तीन आणि चार असे असून सद्यस्थितीत टप्पा क्रमांक एक सोलू ते निरगुडीमधील ३ गावांची भूसंपादन प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे. संबंधित शेतकऱ्यांना एफएसआय / टीडीआर देण्याच्या अनुषंगाने तातडीने संबंधित शेतकऱ्यांसोबत बैठका आयोजित करण्याचे निर्देश महानगर आयुक्त डॉ. योगेश म्हसे यांनी दिले.

हिंजवडी व चाकण भागातील वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी प्रस्तावित रस्त्याच्या भूसंपादन प्रक्रियेबाबत माहिती जाणून घेतली. नवले .ब्रिज परिसरातील वाहतूक व्यवस्थापनासाठी भूसंपादन, जलवाहिनीचे स्थलांतर व सिग्नल यंत्रणा बसविण्याबाबतची सद्यस्थिती जाणून घेण्यात आली. संबंधित विभागांनी समन्वयातून ऑक्टोबरपर्यंत कामे पूर्ण करण्याचे निर्देश दिले.

या बैठकीला पीएमआरडीएचे महानगर आयुक्त डॉ. योगेश म्हसे, अतिरिक्त महानगर आयुक्त दीपक सिंगला, अपर पोलीस आयुक्त मनोज पाटील, विकास परवानगी व नियोजन विभागाचे संचालक अविनाश पाटील, जमीन व मालमत्ता विभागाचे सह आयुक्त हिम्मत खराडे, भूमिअभिलेख विभागाच्या अधीक्षक आशा जाधव, अधीक्षक अभियंता शिवप्रसाद बागडी, भूसंपादन समन्वय अधिकारी, पुणे महानगरपालिका, एनएचएआय, सार्वजनिक बांधकाम विभाग, राष्ट्रीय महामार्ग विभाग यांच्यासह इतर विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.